cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१९५ | सोमवार दि.०५ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### उभा ऊस जनावरांच्या तोंडात सरकारच्या नियोजनाचे काय?

दुष्काळ पडला की सरकारच्या घोषणांना ऊत येतो; पण शेतकऱ्याच्या खात्यात मदत कधी येते? हा प्रश्न आता केवळ शेतकऱ्याचा राहिलेला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेचा आहे. दुष्काळ जाहीर झाला, बैठका झाल्या, शासन निर्णय निघाले, मदतीची मोठी यादी जाहीर झाली. कर्जवसुलीला स्थगिती, वीजबिलात सवलत, महसुलात सूट, चारा-पाण्याच्या उपाययोजना, रोजगाराची कामे आणि पीक नुकसानीची मदतकागदावर सर्व काही आहे. पण कागदावरील मदत आणि शेतकऱ्याच्या हातातील मदत यातील अंतर किती? याचा ठोस हिशेब आता सरकारने द्यायलाच हवा.

# २६५ तालुक्यांत पंचनामे सुरू; अनुदानाचा निर्णय अद्याप प्रलंबित

## दुष्काळी मदतीसाठी शेतकऱ्यांची कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू

पुणे । प्रतिनिधी

**खरीप हंगामात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या संभाव्य दुष्काळी मदतीच्या पार्श्वभूमीवर आता शेतकऱ्यांची कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे. दुष्काळी मदतीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि ऑनलाइन नोंदणीची पूर्तता करून ठेवण्यासाठी शेतकरी सेतू कार्यालये, आपले सरकार सेवा केंद्रे तसेच विविध ऑनलाइन सेंटरकडे गर्दी करत आहेत. शासनाकडून मदतीच्या रकमेबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसला, तरी मदत जाहीर झाल्यानंतर कागदपत्रांच्या अभावामुळे अडचण निर्माण होऊ नये, यासाठी शेतकरी आधीपासूनच तयारी करत आहेत.**

राज्य सरकारने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीचे प्रत्यक्ष मूल्यांकन करण्यासाठी महसूल आणि कृषी विभागाच्या माध्यमातून पंचनाम्याची प्रक्रिया सुरू आहे. पिकांची स्थिती, झालेली हानी आणि दुष्काळी परिस्थितीची तीव्रता यासंदर्भातील अहवाल तयार झाल्यानंतर शासनाकडून पुढील मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. दरम्यान, दुष्काळी यादीत अद्याप समावेश न झालेल्या तालुक्यांतूनही दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जात असून, त्यामुळे दुष्काळी मदतीच्या निर्णयाकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दुष्काळी मदतीचे स्वरूप आणि प्रत्येक शेतकऱ्याला किती रक्कम मिळणार, याबाबत शासनाकडून अद्याप अधिकृत निर्णय झालेला नाही. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर त्याआधारे मदतीची प्रक्रिया पुढे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या शेतकऱ्यांसमोर मदतीची रक्कम किती मिळेल, यापेक्षा मदत मिळण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि



शासकीय नोंदी अद्ययावत ठेवण्याचे आव्हान आहे. दुष्काळी मदतीच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांची ओळख आणि बँक खात्याची पडताळणी महत्त्वाची ठरणार आहे. त्यासाठी आधारकार्ड अद्ययावत आणि उपलब्ध असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात शासनाकडून थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून मदत जमा केली जाण्याची शक्यता असल्याने बँक पासबुक, खाते क्रमांक तसेच आधारशी संबंधित बँक खात्याची माहिती अचूक असणे महत्त्वाचे आहे. बँक खाते आधारशी आणि आवश्यक असल्यास मोबाईल क्रमांकाशी जोडलेले आहे का, याचीही शेतकरी खात्री करून घेत आहेत. जमिनीशी संबंधित कागदपत्रांनाही या प्रक्रियेत महत्त्व राहणार आहे. शेतकऱ्यांकडे त्यांच्या शेतजमिनीचा अद्ययावत सातबारा उतारा आणि ८ अ उतारा उपलब्ध असणे आवश्यक आहे. जमिनीची मालकी, क्षेत्रफळ आणि संबंधित नोंदींच्या पडताळणीसाठी या कागदपत्रांचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे सातबारा उताऱ्यावर जमीनमालकी, क्षेत्रफळ किंवा इतर नोंदींमध्ये काही त्रुटी असल्यास त्या दुरुस्त करून घेण्याची प्रक्रिया शेतकऱ्यांकडून केली जात आहे. याशिवाय खरीप हंगामात शेतात कोणते पीक घेतले होते, याची नोंद ई-पीक पाहणीमध्ये झालेली असणे महत्त्वाचे ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### बँकेने चक्क पैसे देण्यात केली टाळाटाळ!

नवीदिल्ली ;केरळची राजधानी तिरुवनंतपुरम येथील एका विधवा महिलेने बँकेकडे मॅच्युर झालेल्या तिच्या एफडी रकमेची मागणी केली. बँकेने महिलेच्या हक्काची पूर्ण एफडी तिच्याकडे सुपूर्त करण्यास नकार दिला. मुळात त्यावेळी महिलेला पैशांची गरज होती. डोक्यावर गोल्ड लोन होते. आईचे उपचार करायचे होते. या परिस्थितीत त्या महिलेला तिच्या एफडीचा आधार होता. परंतु संबंधित बँकेने पूर्ण एफडी रकमेतील फक्त ५० हजारांची रोख महिलेला देण्याचे सांगितले. महिलेची एफडी जवळपास १३.८७ लाखांची होती. असे असतानाही बँकेने फक्त ५० हजारांची रक्कम देण्याची हमी दिल्यामुळे महिलेने थेट ग्राहक तक्रार आयोगाकडे धाव घेतली.

### बंजारा आरक्षण मिळत नसल्याने आत्महत्या

जिंतूर : बंजारा समाजाला आदिवासी प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्याचा प्रश्न ऐरणीवर आला असताना जिंतूर तालुक्यातील पोखर्णी तांडा येथील विठ्ठल देवराव चव्हाण (वय ३५) या युवकाने बंजारा समाजाला एसटी प्रवर्गामध्ये आरक्षण मिळत नसल्याने काल शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता विष प्राशन करून आत्महत्या केली. आत्महत्येपुर्वी युवकाने चिठ्ठी लीहून ठेवली असून या चिठ्ठीत आरक्षण मिळत नसल्याने आत्महत्या करत असल्याचे म्हटले आहे.इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रात बंजारा समाजाला आदिवासी प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यासाठी लढा सुरू आहे.

### फ्लायदुबईसारखे विमान हल्ले पुन्हा होतील

तेल अवीव : युद्ध अजून संपलेले नाही. इस्लामच्या विरोधात लढणा-यांना घेऊन जाणारी विमाने अजूनही आकाशात उडत आहेत आणि त्यांना लक्ष्य केले जाऊ शकते अशी उघड धमकी अल-कायदाशी संबंधित एका प्रकाशनाने दिली आहे. ३० सप्टेंबर रोजी दुबईहून तेल अवीवकडे जाणा-या फ्लायदुबईच्या विमानातील कॉकपिटमध्ये झालेल्या हल्ल्यानंतर ही धमकी मिळाली आहे. फ्लायदुबईचा सह-वैमानिक (को-पायलट) हमम अल-हमामी याच्या चौकशीदरम्यान ही नवीन बाब समोर आली आहे. विमानाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला.

# स्व.मुंडे,महाजन व काकूंमुळे जिल्ह्याची ओळख होती आता कोणामुळे आहे हे सांगणे कठीणच-प्रा.राम शिंदे

## स्व.काकूंच्या आठवणींना मान्यवरांकडून उजाळा; क्षीरसागर कुटूंबीय भावनिक

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्याची ओळख ही संघर्षमय जीवनाची आणि कतृत्वाची भुमी आहे. या भूमिने केशरकाकू क्षीरसागर, स्व.प्रमोद महाजन, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे नेतृत्व देशाला दिले. या नेत्यांनी केवळ पद मिळण्यासाठी धडपड केली नाही तर मिळालेल्या पदाला न्याय देण्यासाठी संघर्ष केला पूर्वी स्व मुंडे स्व महाजन स्व काकू यांच्या मुळे जिल्ह्याची बाहेर ओळख असायची पण सध्या जिल्ह्याची ओळख कोणामुळे हे सांगणे तसे कठीणच असल्याचे सांगत विधान परिषदेचे अध्यक्ष प्रा. राम शिंदे यांनी नेत्याची संख्या अधिक झाल्याचे नाव न घेता मार्मिक भाष्य केले.**

माजी खा. स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या २० व्या स्मृतिदिनानिमित्त काकू-नाना प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमात स्व काकूंच्या आठवणींना




मान्यवरांकडून उजाळा दिला या भावुक प्रसंगी क्षीरसागर कुटूंबीय भावनिक झाल्याचे पहावयास मिळाले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे होते. यावेळी छत्तीसगड महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. ममता साहू, बीडचे खा. बजरंग सोनवणे, आ. बसवराज पाटील, शिक्षक आ. विक्रम काळे, आ. संदीप साहू, आ.विजय चौधरी, ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प. शिवाजी महाराज नारायणगड, ह.भ.प. विठ्ठल महाराज गहिनीनाथागड, लक्ष्मण महाराज मेंगडे, दया भाई मोदी (अहमदाबाद) यांच्यासह माजी आ. बदामराव पंडित, सिराजोद्दीन देशमुख, जनार्दन तुपे, भीमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, साहेबराव दरेकर, ▶▶ पान २ वर

## ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध चौकशीचे आदेश

कोच्ची। वृतसंस्था

निवडणूक आयोगाद्वारे राबवल्या जाणा-या विशेष सखोल नरावलोकन(एसआयआर) प्रक्रियेवरून वादाच्या भोव-यात सापडलेले मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

त्यांच्याविरुद्ध २० वर्षे जुन्या एका मोठ्या प्रशासकीय आणि भ्रष्टाचार प्रकरणाची पुन्हा चौकशी सुरू करण्यात आली आहे. केरळचे गृहमंत्री रमेश चेन्निथला यांनी त्यांच्यावरील भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी स्वरूपाचा निधीचा गैरवापर अशा गंभीर आरोपांची व्हिजिलन्स (दक्षता विभाग) द्वारे चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.ज्ञानेश कुमार १९८८ च्या बॅचचे आयएएस (कअर) अधिकारी आहेत. २००६ मध्ये ते केरळमध्ये ▶▶ पान २ वर

## आज पाऊल उचलले, उद्या हात उचलावा लागेल-उद्धव ठाकरे

मुंबई । प्रतिनिधी

बांगलादेशी महाराष्ट्रात घुसतात कसे? देशामध्ये कुणी घुसू दिले? राहू दिले कुणी? बांगलादेशींच्या नावाखाली तुम्ही माझ्या देशाच्या नागरिकाला त्याच्या मतदानाचा अधिकार काढून घेणार असाल, मग आम्हाला नाईलाजाने आज पाऊल उचलले आहे, उद्या हात उचलावा लागेल'', असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.



विरोधी पक्षांकडून आज मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात मुंबईत मोर्चा काढण्यात आला. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार भाषण केलं. ''सत्ताधाऱ्यांनी व्होट चोरी केलीच, राम मंदिराची दानपेटी चोरी करणारे निर्घृण गुन्हेगार तुम्ही, पक्ष चोरणारे षंड तुम्ही, ही लोकं षंढ आहेत? ४५ लाख मतदार वाढले, त्यांचं काही कर्तृत्व नाहीय? हे फक्त कागदावर या सगळ्या गोष्टी करत आहेत. म्हणून ज्ञानेश कुमार हे त्यांचं हत्यार आहे'', असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.''आज कुठेही गेलं, निदान आम्हाला ▶▶ पान २ वर

## दिवाळी-दसऱ्याच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींना गिफ्ट

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारच्या अत्यंत लोकप्रिय असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी एक मोठी आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. ऑगस्ट महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता मिळाल्यानंतर आता राज्यातील लाखो महिला सप्टेंबर महिन्याच्या सन्मान निधीची आतुरतेने वाट पाहत आहेत. नवरात्रोत्सव आणि दस-याच्या सणासुदीच्या पार्श्वभूमीवर हा हप्ता वितरित करण्याची तयारी राज्य सरकारकडून केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २५ ऑक्टोबरनंतर लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरद्वारे सप्टेंबरचा निधी जमा होण्यास सुरुवात होण्याची दाट शक्यता आहे.

यापूर्वी राज्य सरकारने रक्षाबंधन आणि गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणांच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींच्या खात्यावर वेळेत पैसे वर्ग केले ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०३ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४०.५० क्विंटल | २,६५१ | ३,०८० | २,८५३४ |
| ज्वारी/हायब्रिड : १४४.५० क्विंटल | ३,२०२ | ५,४७० | ३,९८४ |
| मका/लोकल: १.५० क्विंटल | २,४३६ | २,४३६ | २,४३६ |
| तूर : २०.०० क्विंटल | ९,२२१ | ९,२२१ | ९,२२१ |
| उडीद : २८.५० क्विंटल | ८,४०० | ९,३३० | ९,१२९ |
| बाजरी: ४७.०० क्विंटल | २,१०० | २,९०० | २,५८६ |
| मुग: ३.०० क्विंटल | ७,००० | ९,४३५ | ८,२१७ |
| सोयाबीन: १४९.५० क्विंटल | ३,५०१ | ६,२०० | ५,८६८ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ७,३०१ | ७,३०१ | ७,३०१ |

# देशात दरवर्षी १.९ लाख लोक कर्करोगाचे नवे रुग्ण

नवी दिल्ली । वृतसंस्था

**कॅन्सर अथवा कर्करोग हा सर्वसामान्यपणे वाईट जीवनशैली, तंबाखू, दारू अथवा अनुवंशिकतेमुळे होतो, असा अनेकांचा समज आहे. मात्र, द लॅन्सेट ऑन्कोलॉजी या वैद्यकीय नियतकालिकाने नुकताच एक जागतिक अहवाल प्रसिद्ध केला. भारतात जीवाणू अर्थात बॅक्टेरिया आणि विषाणू अर्थात व्हायरसच्या संसर्गामुळे दरवर्षी सुमारे १.९ लाख कर्करोगाचे नवे रुग्ण समोर येत आहेत असे या अहवालात म्हणण्यात आले आहे.**

दिवसागणिक कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्रातही कॅन्सरचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. केंद्र सरकारने आयसीएमआख्या हवाल्याने दिलेल्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये महाराष्ट्रात १ लाख ३० हजार ४६५ नवीन कर्करोग रुग्ण होते. हा आयसीएमआर एनसीडीआयआरचा अंदाज असून, २०२४ मध्ये १ लाख



२७ हजार ५१२ कॅन्सर रुग्णांचा अंदाज होता. त्यामुळे वर्षभरात नवीन रुग्णसंख्येत २,९५३ ने वाढ झाली आहे. देशातील राज्यनिहाय आकडेवारीत महाराष्ट्राचा क्रमांक उत्तर प्रदेशनंतर दूसरा आहे. कर्करोगाचे प्रमाण भारतामध्ये गेल्या तीन दशकांत (१२२० ते २०२३) २६.४ टक्क्यांनी वाढले आहे. अहवालानुसार, देशपातळीवरही २०२४ मधील १५ लाख ३३ हजार ५५५ वरून २०२५ मध्ये १५ लाख ६९ हजार ७९३ नवीन कर्करोग रुग्ण वाढल्याचा सरकारी अंदाज आहे.भारतात संसर्गामुळे होणा-या कर्करोगात 'ुमन पॅपिलोमा व्हायरस' अर्थात लृढश्? हे एक सर्वात मोठे कारण आहे. केवळ या एकाच व्हायरसमुळे तब्बल १ लाखांहून अधिक कॅन्सर बाधित झाले आहेत. महत्वाचे म्हणजे, महिलांमधील गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगासाठीही हा एक मुख्य कारण ठरतो. मात्र, वेळेवर लसीकरणाच्या माध्यमाने यापासून पूर्णपणे बचावही शक्य आहे.हेलिकोबॅक्टर पायलोरी, पोटातील या बॅक्टेरियामुळे सुमारे ४७,००० रुग्णांना पोटाचा कर्करोग झाला आहे. हेपॅटायटिस ▶▶ पान २ वर

### संसर्गाचा वाटा १२ टक्के

जागतिक आरोग्य संघटनेच्या 'इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर'च्या संशोधकांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, भारतात २०२४ मध्ये १५.६२ लाखांहून अधिक कॅन्सर रुग्णांची नोंद झाली. यापैकी तब्बल १२ टक्क्यांहून अधिक रुग्ण केवळ जुन्या संसर्गामुळे समोर आले आहेत.



नोंदणी क्र.ए-९६२ (बीड)

## श्री खंडेश्वरी देवी संस्थान, ट्रस्ट बीड

✻ अध्यक्ष ✻

श्री. अभिजीत (राणा) रणजितसिंह चौव्हाण

मो.९४२२२४२७५०/९३०३९४९४९४

जा.क्र. दिनांक : ०५/१०/२०२६

### श्री.खंडेश्वरी देवी नवरात्र महोत्सव सन २०२६-२७

**दिनांक ११.१०.२०२६ ते दि.२०.१०.२०२६ या कालावधीत श्री. खंडेश्वरी नवरात्र महोत्सवानिमित्त स्टॉल धारकांसाठी जागा वाटप कार्यक्रम खालीलप्रमाणे राहिल.**

**दि. ०६.१०.२०२६ रोजी वार मंगळवार सकाळी ठिक ११-०० वाजता फुलवाले, झेंडीवाले, पेढेवाले, कटलरी व ज्वेलरी इत्यादी.**

**दि. ०७.१०.२०२६ रोजी वार बुधवार सकाळी ठिक ११-०० वाजता आईस्क्रीम, वडापाव, पावभाजी, हॉटेल, पानटपरी, भोई इत्यादी व्यवसाईक.**

टीपः- १) जागा वाटप त्याच दिवशी दिलेल्या वेळेतच होईल. जागेचा बांधकाम निधी घेऊन ताबा त्याचवेळी देण्यात येईल. जागा सर्व धर्मियासाठी वाटप होईल. यात्रेत गॅस वापरास बंदी करण्यात आली आहे. आपले रहिवाशी प्रमाणपत्राची /आधारकार्डची सत्यप्रत द्यावी लागेल, अन्न व भेसळ परवाना बंधनकारक २) श्री. खंडेश्वरी देवी संस्थान विश्वस्त मंडळाचा ठराव ०१ प्रमाणे आकाशवाणी टी पॉईटपासून रोडची दोन्ही बाजू व श्री. खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात छायाचित्रांकित डिजीटल बोर्ड १जाहिरात लावण्यास मनाई केली असून जो या निर्णयाचे उल्लंघन करील अशा व्यक्तीविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३) तसेच ज्या भाविक भक्तांना नवरात्र महोत्सवात देवीची महाआरती रात्री. ०८:३० वाजता व सकाळी ०८:३० वाजता करावयाची असेल त्यांनी अगावू सुचना ०४ दिवस अगोदर मंदिराच्या कार्यालयात नोंद करावी किंवा श्री. खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्टचे कोषाध्यक्ष श्री. राजेंद्रजी बन्सोडे यांच्याशी संपर्क करावा. (संपर्क क्रं.९४२२२४०१५५)

स्वाक्षरीत/- **अध्यक्ष** स्वाक्षरीत/- **सचिव**

**श्री. खंडेश्वरी देवी संस्थान ट्रस्ट, बीड.**

मो.नं ९४२२२४२७५०/९३०३९४९४९४

cmyk

## अग्रलेख

# उभा ऊस जनावरांच्या तोंडात; सरकारच्या नियोजनाचे काय?

दुष्काळ पडला की सरकारच्या घोषणांना ऊत येतो; पण शेतकऱ्याच्या खात्यात मदत कधी येते? हा प्रश्न आता केवळ शेतकऱ्याचा राहिलेला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेचा आहे. दुष्काळ जाहीर झाला, बैठका झाल्या, शासन निर्णय निघाले, मदतीची मोठी यादी जाहीर झाली. कर्जवसुलीला स्थगिती, वीजबिलात सवलत, महसुलात सूट, चारा-पाण्याच्या उपाययोजना, रोजगाराची कामे आणि पीक नुकसानीची मदतकागदावर सर्व काही आहे. पण कागदावरील मदत आणि शेतकऱ्याच्या हातातील मदत यातील अंतर किती? याचा ठोस हिशेब आता सरकारने द्यायलाच हवा.

महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाले आहेत. एवढ्या मोठ्या भूभागावर शेती, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असताना केवळ घोषणा करून संकट संपणार नाही. शेतकऱ्याच्या शेतात पीक उभे नाही, जनावरांसाठी चारा नाही, विहिरींमध्ये पाणी नाही आणि कर्जाचा ताण कायम आहे. अशा परिस्थितीत 'पंचनामे सुरू आहेत', 'लवकरच मदत मिळेल', 'निधी उपलब्ध करून दिला जाईल' या आश्वासनांचा आधार घेऊन शेतकरी किती दिवस वाट पाहणार? सरकारने पीक नुकसानीचे पंचनामे जीपीएस छायाचित्रांसह करण्याचे आदेश दिले आहेत. ही प्रक्रिया आवश्यक आहे; पण तिची पारदर्शकता त्याहून महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्याचा पंचनामा प्रगती अहवाल सार्वजनिक का होऊ नये? किती गावांचे पंचनामे पूर्ण झाले? किती हेक्टर क्षेत्राचे नुकसान नोंदवले? किती शेतकरी पात्र ठरले? किती निधीची मागणी करण्यात आली? किती निधी मंजूर झाला? किती वितरित झाला? आणि सर्वांत महत्त्वाचेप्रत्यक्ष किती शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली? हे आकडे सरकारच्या संकेतस्थळावर सहज उपलब्ध झाले पाहिजेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला कार्यालयांच्या फेऱ्या मारायला लावून, अर्ज-प्रमाणपत्रांच्या कागदपत्रांत अडकवून किंवा तांत्रिक अडचणींमुळे मदत रोखली जाणार असेल, तर दुष्काळी मदतीच्या घोषणांचा अर्थच काय? दुष्काळी मदत म्हणजे केवळ पीकभरपाई नाही. शेतकरी, जमीन आणि पशुधन या तिन्हींचे संरक्षण झाले पाहिजे. चारा डेपो कुठे सुरू झाले? त्यात किती चारा उपलब्ध आहे? किती जनावरांना त्याचा लाभ मिळत आहे? पिण्याच्या पाण्यासाठी किती टँकर सुरू आहेत? रोजगार हमीची किती कामे प्रत्यक्ष सुरू आहेत? कर्जवसुलीला दिलेली स्थगिती प्रत्यक्षात किती खात्यांना लागू झाली? वीजसवलतीचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळाला? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आकडेवारीसह मिळाले पाहिजे. कारण सरकारी यंत्रणेत निधीची कमतरता हा एकमेव प्रश्न नाही. निधीची तरतूद झाली म्हणजे मदत झाली असे होत नाही. निधी मंजूर होणे, निधी वितरित होणे आणि लाभार्थ्याच्या खात्यात पैसा जमा होणे या तीन वेगळ्या पायऱ्या आहेत. सरकारने या तिन्ही टप्प्यांचा हिशेब जनतेसमोर ठेवला पाहिजे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी आणि इतर शासकीय यंत्रणांमधून दुष्काळग्रस्तांसाठी मदतीची तरतूद केली जाते. मग प्रश्न निधीच्या घोषणेचा नसून निधीच्या वापराचा आणि परिणामाचा आहे. किती कोटींची घोषणा झाली, यापेक्षा किती कोटी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले, हा खरा प्रश्न आहे. याहून मोठा प्रश्न म्हणजे दुष्काळ येण्यापूर्वीची तयारी. पाऊस सरकारच्या हातात नाही; पण पावसाचे पाणी अडवणे, भूजल वाढवणे, चारा साठवणे, पाण्यानुसार पीकपद्धती ठरवणे आणि टंचाईग्रस्त भागांसाठी आधीच कृती आराखडा तयार करणे सरकारच्या हातात आहे. दरवर्षी पाऊस कमी झाला की नवी मदत जाहीर करण्यापेक्षा दुष्काळाचा परिणाम कमी करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे.दुष्काळ जाहीर करणे ही सरकारची कामगिरी नाही; दुष्काळात शेतकरी उद्ध्वस्त होऊ नये, ही सरकारची खरी जबाबदारी आहे. घोषणा करणे सोपे आहे. निधी मंजूर करणेही सोपे आहे. पण तो निधी योग्य लाभार्थ्यापर्यंत, योग्य वेळी आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय पोहोचवणे ही खरी कसोटी आहे. म्हणून आता सरकारने प्रसिद्धीपत्रके नव्हे, हिशेबपत्रक द्यावे. तालुकानिहाय किती नुकसान, जिल्हानिहाय किती मंजुरी, विभागनिहाय किती खर्च आणि लाभार्थीनिहाय किती रक्कमसर्व काही जनतेसमोर आले पाहिजे. दुष्काळाच्या घोषणांचा पाऊस खूप झाला. आता आकडे दाखवा. निधी किती? मंजुरी किती? वितरण किती? आणि शेतकऱ्याच्या खात्यात प्रत्यक्ष जमा किती? कारण दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला आश्वासन नको; त्याच्या हातात मदत हवी.

# मराठवाडा पदवीधर निवडणुकीच्या रणांगणात अंकुशराव शिंदे!

## बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी ५ ऑक्टोबरला छत्रपती संभाजीनगर येथे उमेदवारी अर्ज दाखल करणार

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा राज्य पोलीस दलातील अग्रगण्य नाव म्हणून ओळख निर्माण केलेले सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे हे छत्रपती संभाजीनगर-मराठवाडा पदवीधर विधान परिषद निवडणुकीच्या रणांगणात उतरणार असल्याची माहिती समोर आली आहे. सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील आयुक्तालय कार्यालयात ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. त्यांच्या उमेदवारीमुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील**



**निवडणुकीच्या राजकीय वातावरणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.**

मराठवाड्यातील पदवीधर तरुणांच्या विविध प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना पदवीधरांमध्ये निर्माण झाली आहे. सत्ताधारी असो अथवा विरोधक, पदवीधरांच्या अपेक्षांना अपेक्षित न्याय मिळाला नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या तीन टर्मपासून विद्यमान आमदारांकडून पदवीधरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही केला जात आहे. सत्तेत असतानाही उपेक्षा आणि सत्ता नसतानाही उपेक्षा, अशीच भूमिका आतापर्यंत राहिल्याची भावना अनेक पदवीधरांमध्ये असल्याचे बोलले जात आहे.

### पदवीधर तरुणांचा नवा चेहरा देण्याचा आग्रह

आत्तापर्यंत ज्या लोकांवर पदवीधरांनी विश्वास दाखविला, त्यांच्याकडूनच अपेक्षाभंग झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे यावेळी प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीने पदवीधरांच्या प्रश्नांसाठी पुढे यावे, अशी अपेक्षा मराठवाड्यातील पदवीधर तरुणांकडून व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील होळ गावचे रहिवासी आणि बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे यांनी ही निवडणूक लढवावी, असा आग्रह मराठवाड्यातील पदवीधर तरुणांकडून केला जात असल्याचे सांगितले जात आहे.

### पोलीस दलातील उत्कृष्ट सेवेचा अनुभव

अंकुशराव शिंदे यांनी राज्य पोलीस दलात दीर्घकाळ सेवा बजावताना विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांच्या कार्याची पोलीस दलात वाखाणणी झाली असून, त्यांच्या सेवेला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी गौरविण्यात आल्याचे सांगितले जाते. पोलीस दलाच्या माध्यमातूनही त्यांच्या कार्याचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवताना सामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणे, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहणे, ही त्यांच्या सेवाकाळातील वैशिष्ट्ये राहिली असल्याची भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. निष्कलंक आणि उत्कृष्ट सेवेसाठी ओळख असलेले अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

### पदवीधरांच्या जीवनात सकारात्मक बदलाची अपेक्षा

मराठवाड्यातील पदवीधर तरुणांसमोर रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, शासकीय नोकऱ्या, उद्योग-व्यवसायाच्या संधी तसेच भविष्यातील करिअरचे अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि पदवीधरांच्या हक्कांसाठी आवाज उठविण्यासाठी अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे. अंकुशराव शिंदे यांनी पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढविल्यास त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा पदवीधरांच्या प्रश्नांसाठी उपयोग होऊ शकतो, अशी अपेक्षा त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे पदवीधर तरुणांमध्येही नव्या नेतृत्वाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

### ५ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार

दरम्यान, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे हे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयुक्तालय कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे आतापर्यंतच्या प्रस्थापित राजकीय समीकरणांना धक्का बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिंदे हे उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नेमकी कोणती भूमिका मांडतात, पदवीधरांसाठी कोणते मुद्दे घेऊन ते मैदानात उतरतात आणि निवडणुकीची त्यांची रणनीती काय असते, याकडे आता संपूर्ण मराठवाड्यातील पदवीधरांचे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्याच्या मातीतून राज्य पोलीस दलात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे अंकुशराव शिंदे आता पदवीधरांच्या प्रश्नांसाठी निवडणुकीच्या मैदानात उतरत असल्याने त्यांच्या उमेदवारीची पुढील भूमिका आणि त्याला मिळणारा प्रतिसाद याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संघर्ष टाळण्याची भूमिका; मात्र ऊस दरासाठी शेतकरी संघर्षाच्या तयारीत!

## पहिली उचल ४२५०, अंतिम उचल ५००० रुपयांची मागणी; ११ ऑक्टोबरला माजलगावात ऊस परिषद

**माजलगाव | प्रतिनिधी**

**दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता यंदा साखर कारखानदार आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संघर्ष टाळून चर्चेतून ऊस दराचा प्रश्न सोडवावा, अशी प्राथमिक भूमिका युवा शेतकरी संघर्ष समिती व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने घेतली आहे. मात्र, कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास संघर्ष अटळ असल्याचा इशाराही समितीने दिला आहे. यासंदर्भात रविवार, ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव येथील जुना मोंढा मैदानावर ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.**

मागील वर्षी ऊस दरासाठी समितीने बीड व परभणी जिल्ह्यांत मोठे आंदोलन उभे केले होते. तब्बल दहा दिवस साखर कारखाने आणि गुऱ्हाळ उद्योग बंद ठेवून शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी संघर्ष करण्यात आला होता. यंदा मात्र दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि कारखानदार दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याने चर्चेतून तोडगा काढण्यावर समितीचा भर आहे. चालू गळीत हंगामासाठी उसाला प्रतिमेट्रिक टन ४२५० रुपये पहिली उचल आणि ५००० रुपये अंतिम उचल देण्यात यावी, अशी समितीची प्रमुख मागणी आहे. खते, औषधे, मजुरी, सिंचन, तोडणी आणि वाहतूक खर्चात वाढ झाल्याने ऊस उत्पादनाचा खर्च वाढला आहे. त्याचवेळी साखरेच्या दरातील वाढीचा योग्य लाभही शेतकऱ्यांना मिळायला हवा, अशी भूमिका समितीने मांडली आहे. शासनाने १५ ऑक्टोबरपर्यंत किंवा त्यापूर्वी गळीत हंगाम सुरू करण्याचे निर्देश दिले असताना, बीड आणि परभणी जिल्ह्यांतील बहुतांश कारखान्यांनी अद्याप ऊस दर जाहीर केलेला नाही. त्यामुळे कारखाने सुरू करण्यापूर्वी शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा करून दर निश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. चालू हंगामाच्या दरासोबतच ओमकार शुगरकडील मागील वर्षांची थकीत बिले, येडेश्वरी शुगरकडील प्रलंबित २०० रुपये आणि लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याकडील मागील तीन वर्षांपासूनचे प्रतिमेट्रिक टन ४९ रुपयांचे प्रलंबित बिल अदा करण्याची मागणी समितीने केली आहे. ऊसतोडणी व वाहतूकदारांची थकीत बिले आणि कमिशन देण्याचाही आग्रह धरण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थिती पाहता शासनाने ऊस उत्पादकांना प्रतिमेट्रिक टन ५०० रुपये सानुग्रह अनुदान किंवा प्रतिहेक्टर ७० हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित कारखाने आणि गुऱ्हाळ उद्योगांना निवेदने देण्यात आली असून, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रशासनाने मध्यस्थी करावी, अशी विनंती केली जाणार आहे. ऊस परिषदेच्या पार्श्वभूमीवर बीड आणि परभणी जिल्ह्यांतील गावोगावी बैठका घेऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती सुरू आहे. ११ ऑक्टोबरच्या परिषदेत ऊस उत्पादन खर्च, साखरेचे दर, शेतकऱ्यांचा मोबदला आणि थकीत बिले यावर चर्चा होणार आहे. कारखानदारांनी चर्चेतून योग्य तोडगा काढल्यास संघर्ष टाळता येईल. मात्र, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन तीव्र करण्यासह तोडगा निघेपर्यंत कारखाने बंद ठेवण्याची भूमिका घेण्याची तयारी असल्याचे समितीच्या सूत्रांनी सांगितले. त्यामुळे आगामी ऊस परिषदेकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह साखर कारखानदारांचेही लक्ष लागले आहे.

# बीडच्या तीन खेळाडूंची रणजी संघात निवड

## डॉ.योगेश क्षीरसागरांसह बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून अभिनंदन

**बीड | प्रतिनिधी**

**महाराष्ट्र रणजी संघात बीड जिल्ह्यातील तीन गुणवंत खेळाडूंची निवड झाल्याने बीडच्या क्रीडा विश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. २०२६-२७ च्या रणजी हंगामासाठी सौरभ नवले, सचिन धस आणि ऋषिकेश सोनवणे या तीन खेळाडूंनी आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघात स्थान मिळवले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.**







एकाच वेळी बीड जिल्ह्यातील तीन खेळाडूंची रणजी संघात निवड होणे ही जिल्ह्याच्या क्रिकेट इतिहासातील अभिमानास्पद बाब मानली जात आहे. क्रिकेटच्या अत्याधुनिक सुविधा आणि प्रशिक्षणाच्या मर्यादा असतानाही या युवा खेळाडूंनी जिद्द, मेहनत, सातत्य आणि कौशल्याच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे बीड जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

या यशाबद्दल खेळाडूंच्या पालकांशी संपर्क साधून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अभिनंदन केले आहे. तसेच, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांनीही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून...

### २६५ तालुक्यांत पंचनामे सुरू;

ठरणार आहे. पिकांच्या प्रत्यक्ष स्थितीचे आणि नुकसानीचे मूल्यांकन करताना ई-पीक पाहणीतील नोंदी उपयोगी ठरतात. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई-पीक पाहणीची नोंद पूर्ण केलेली नाही किंवा नोंदीमध्ये काही त्रुटी आहेत, त्यांनी संबंधित पद्धतीने त्या तपासून घेणे आवश्यक ठरत आहे. शासनाच्या कृषीविषयक योजनांसाठी शेतकरी नोंदणीचा फार्मर आयडीही महत्त्वाचा घटक बनला आहे. विविध योजनांचा लाभ थेट पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांची डिजिटल नोंदणी आणि त्यांची माहिती अद्ययावत करण्यावर शासनाचा भर आहे. त्यामुळे दुष्काळी मदतीच्या प्रक्रियेतही फार्मर आयडीची आवश्यकता भासू शकते. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी तयार केलेला नाही, त्यांनी संबंधित सुविधा केंद्रातून त्याची प्रक्रिया पूर्ण करून घेण्याची लगबग सुरू केली आहे. दरम्यान, दुष्काळी परिस्थितीत झालेल्या नुकसानीचे प्रत्यक्ष मूल्यांकन करण्यासाठी महसूल आणि कृषी विभागाच्या माध्यमातून पंचनामे केले जात आहेत. या पंचनाम्यांमध्ये शेतातील पिकांची स्थिती, नुकसान आणि संबंधित बाबींची नोंद केली जात आहे. त्यामुळे पंचनामा हा दुष्काळी मदतीच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा आधार ठरण्याची शक्यता आहे. पंचनाम्याची प्रक्रिया सुरू असलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांकडून संबंधित अधिकाऱ्यांकडे आपल्या नुकसानीची योग्य नोंद झाली आहे का, याबाबतही चौकशी केली जात आहे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांची यादी आणि मदतीची प्रक्रिया शासनाच्या निर्णयानुसार पुढे जाईल. पात्र लाभार्थ्यांची नावे निश्चित झाल्यानंतर बँक खाते आणि ओळख पडताळणीसाठी केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी लागू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधारकार्ड, बँक खाते, जमिनीचे उतारे, ई-पीक पाहणी आणि फार्मर आयडी यांसह संबंधित नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. दुष्काळी मदत मिळण्यासाठी नेमकी कोणती कागदपत्रे आणि कोणती प्रक्रिया अंतिम राहील, याबाबत शासनाकडून अधिकृत मार्गदर्शक सूचना आल्यानंतरच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सध्या सोशल मीडियावर किंवा विविध माध्यमांतून प्रसारित होणाऱ्या अपूर्ण अथवा अनधिकृत माहितीकडे शेतकऱ्यांनी सावधपणे पाहण्याची गरज आहे. शासनाचा अधिकृत निर्णय आणि संबंधित विभागांच्या सूचनांनुसारच अंतिम कागदपत्रांची पूर्तता करावी. दरम्यान, दुष्काळी मदतीसाठी शासनाकडून स्वतंत्र निर्णय होण्यापूर्वीच सेतू केंद्रे, ऑनलाइन सेंटर आणि संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये शेतकऱ्यांची गर्दी वाढू लागली आहे. अनेक शेतकरी आपल्या कागदपत्रांची स्थिती तपासून घेत असून, बँक खाते आधारशी जोडले आहे का, सातबारा आणि ८ अ उतारे अद्ययावत आहेत का, ई-पीक पाहणीची नोंद झाली आहे का आणि फार्मर आयडी तयार आहे का, याची खात्री करून घेत आहेत. शासनाकडून दुष्काळी मदतीची घोषणा झाल्यानंतर कागदपत्रांच्या अभावामुळे किंवा नोंदीतील त्रुटींमुळे लाभापासून वंचित राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी आतापासूनच आवश्यक कागदपत्रे आणि माहिती तयार ठेवण्यावर भर दिला आहे. पंचनामे पूर्ण होऊन शासनाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर दुष्काळी मदतीची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू होणार असल्याने आता शेतकऱ्यांचे लक्ष पंचनाम्यांच्या अहवालाकडे आणि शासनाच्या मदतीच्या निर्णयाकडे लागले आहे.

-----------------

### स्व.मुंडे,महाजन व काकूंमुळे

सहाल चाऊस, दत्ताजी साहू, लक्ष्मी सावरकर, रामलालजी साहू आदींची प्रमुख उपस्थिती होती. केंद्रीय राज्यमंत्री साहू बोलताना म्हणाले की, बीड ही ऐतिहासिक भूमी आहे. या भूमीतून देशाचे नेतृत्व करण्याची ताकद निर्माण झाली. देशभर विखुरलेल्या साहू समाजाला एकत्रित करून संघटनात्मक नेतृत्वाची नवी दिशा देण्याचे ऐतिहासिक कार्य स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी केले. या भूमीला आणि काकूंच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करण्यासाठी मी बीडमध्ये आलो आहे, असे प्रतिपादन आवास व शहरी विकास केंद्रीय राज्यमंत्री टोकण साहू यांनी केले.बीड जिल्ह्याशी संबंधित कोणतेही काम माझ्याकडे आले तर त्याला प्रथम प्राधान्य देऊन ते सोडविण्यासाठी प्रयत्न करेन. दुष्काळाच्या प्रश्नावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी वॉटर ग्रीडचे काम माझ्यावर सोपवा; ते पूर्णत्वास नेण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करेन.यानंतर प्रा. राम शिंदे बोलताना म्हणाले की, कर्जत-जामखेड मार्गे बीड जिल्ह्यात पाणी आणून जिल्ह्यातील ११ही तालुक्यांची तहान भागविण्याच्या दृष्टीने मोठे काम सुरू आहे. सुमारे ५५ टीएमसी पाण्याच्या माध्यमातून बीडच्या जमिनीची तहान भागविण्याचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न सुरू असून त्यासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू असे त्यांनी सांगितले.यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी अध्यक्षीय भाषणात भावनिक शब्दांत काकूंच्या कार्याचा आणि बीडच्या जनतेशी असलेल्या क्षीरसागर कुटुंबाच्या ऋणानुबंधाचा उल्लेख केला. ज्याचा कोणी वाली नाही, त्या लोकांचा मी वाली आहे. कोणताही मोबदला न घेता घरपोच सेवा देणारा माणूस म्हणून मी सदैव जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. बीड जिल्ह्यातील जनतेचे उपकार आम्ही कधीही विसरणार नाही. आम्हाला सत्तेच्या ताटावर नेऊन बसविण्यात १८ पगड जातीतील गोरगरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांचे योगदान आहे. त्या सर्वांचे ऋण क्षीरसागर कुटुंब कधीही विसरणार नाही, असे ते म्हणाले.केशर काकूंच्या विकासात्मक कार्याचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, रेल्वे, शाळा, महाविद्यालये, दूरदर्शन आणि आकाशवाणी केंद्र यांसारख्या सुविधा बीडमध्ये आणण्यासाठी काकूंनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बीडच्या विकासाला नवी दिशा मिळाली.बीड रेल्वेसाठीचे त्याचे योगदान विसरता येणार नाही असे ना शिंदे म्हणाले .

-----------------

### दिवाळी-दसऱ्याच्या मुहूर्तावर

होते. ऑगस्ट महिन्याचा हप्ता देण्याची प्रक्रिया सप्टेंबरच्या अखेरपासून सुरू झाली होती आणि २ ऑक्टोबरपर्यंत बहुतांश महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले होते. आता दसरा आणि आगामी दिवाळी सणाचा विचार करता, सणासुदीच्या काळात महिलांच्या हाताला आर्थिक बळ मिळावे या उद्देशाने सरकारकडून सप्टेंबरचा हप्ता २५ ऑक्टोबरच्या आसपास जमा करण्याचे नियोजन केले जात आहे.सप्टेंबर महिन्याचा हप्ता वितरित झाल्यानंतर राज्यातील सुमारे १ कोटी ६६ लाख पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात प्रत्येकी १,५०० रुपये जमा होतील. ही रक्कम थेट महिलांच्या आधारशी लिंक असलेल्या बँक खात्यात जमा होणार असल्याने कोणतीही अडचण येणार नाही.

-----------------

### आज पाऊल उचलले, उद्या

मत देण्याची चोरी नव्हती. आज मत चोरी करायला लागले आहेत, मतदानाचा अधिकार सुद्धा हे काढून घेत आहेत. पण त्यांना अजून लक्षात आलेलं नाही. न्यायसंस्था तुम्ही ताब्यात घेतली असेल, प्रशासन ताब्यात घेतलं असेल, आणखी काही संस्था तुम्ही ताब्यात घेतल्या असतील. पण हे रस्ते जनतेच्या मालकीचे आहेत. या रस्त्यांवर उद्या तुम्हाला फिरणं मुश्किल होऊन जाईल. या उद्या रस्त्यावर'', असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.''तुम्ही सगळं ओरबाडून घेतलं आहे, त्याच्यासाठी हा लढा आहे. या एसआयआरचा उद्देश सांगितला की, आम्ही बांगलादेशी शोधतोय. मग सांगा आम्हाला की, महाराष्ट्रामध्ये एसआयआरमध्ये जे २ कोटी मतदार वगळले त्यापैकी किती बांगलादेशी पकडले? दाखवाना. आम्ही देतो त्यांना हाकलून. आम्ही येतो तुमच्यासोबत. त्यांना सीमेवर पोहचवण्याची जबाबदारी आम्ही घेतो. पण सीमा या तुमच्या हातात आहेत. केंद्राच्या हातात सीमा आहेत'', असं उद्धव ठाकरे म्हणाले.

**कधी नव्हे तेवढ्या शिव्या पंतप्रधानांना पडतात**

तुमचा एवढा मोठा पक्ष आहे आणि तुम्ही एवढं काम केलं आहे, एवढ्या बहुमताने तुम्ही निवडून येत आहेत तर संपूर्ण देशात आजपर्यंत कधीही घडलं नाही, जे काँग्रेस काळात घडलं नाही, ते भाजपने करुन दाखवलं. आजपर्यंत जेवढ्या शिव्या कधीही पंतप्रधानांना पडल्या नव्हत्या, तेवढ्या शिव्या पहिले प्रथम आजच्या पंतप्रधानांना पडत आहेत. अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

-----------------

### देशात दरवर्षी १.९ लाख

बी आणि सी'मुळे अनुक्रमे १०००० आणि ५३०० कर्करोग रुग्णांची नोंद झाली आहे. तर एपस्टाईन-बार व्हायरस हा सुमारे २२००० कर्करोग रुग्णांसाठी जबाबदार आढळला आहे.हा धोका वेळेत टाळता येऊ शकतो, असेही तज्ज्ञांनी म्हटले आहे. लहान वयात मुलींना एचपीव्ही लस देणे, नवजात बालकांना हेपॅटायटिस बी चे लसीकरण करणे आणि पोटाच्या जुन्या समस्यांवर तात्काळ वैद्यकीय उपचार घेणे, हाच यावर सर्वोत्तम उपाय आहे असे मत आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

-----------------

### ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध

सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळातील आर्थिक गैरव्यवहाराबाबत मलयानकीझू वेणुगोपाल यांनी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत आरोप करण्यात आला आहे की २००६ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव असताना, ज्ञानेश कुमार यांनी केरळ राज्य परिवहन प्रकल्पअंतर्गत रस्ते बांधकामाचे कंत्राट देताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता आणि गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन केले होते.वाढत्या वादामुळे, २००६ साल संपण्यापूर्वीच ज्ञानेश कुमार यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवपदावरून हटवून त्यांची बदली करण्यात आली होती. त्यावेळी प्राथमिक चौकशी करण्यात आली होती. मात्र कोणत्याही तार्किक निष्कर्षापर्यंत न पोहोचताच दबावाखाली ती चौकशी बंद करण्यात आली, असा आरोप तक्रारदाराने केला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. ०५ ऑक्टोबर २०२६



## थोडक्यात

### जिल्ह्यात सुरक्षित अन्न व पोषक आहार समितीची बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सुरक्षित अन्न व पोषक आहार जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे पार पडली. या बैठकीमध्ये नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित अन्न व संतुलित आहार मिळावा यासाठी विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, याबाबतचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले आहेत. तसेच आगामी काळात शालेय विद्यार्थी आणि अंगणवाडीतील बालकांना मिळणाऱ्या 'मिड डे मील' ची योग्य तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोषक व सुरक्षित अन्न पुरविण्यास उत्तेजन देऊन योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी संबंधितांना देण्यात आल्या. तसेच, आगामी सणासुदीच्या काळात अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही व मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉनन्स यांच्यासह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. के. पिंगळे, जिल्हा पुरवठा अधिकारी वधू प्रधाताटे, जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी प्रा. डी. आर. शिंदे, जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयीन प्रतिनिधी चंद्रकांत पांडव, जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेचे सचिन दोडके, अन्न सुरक्षा अधिकारी अ. भ. गाढे आणि अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त तथा समितीचे सदस्य सचिव नि. दि. मोहिते आदी अधिकारी उपस्थित होते.

### विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी अभिषेक चौरेची निवड

केज । प्रतिनिधी

बालाघाटच्या डोंगरपट्ट्यातील जीवाचीवाडी येथील पैलवान अभिषेक आनंता चौरे याची ५७ किलो वजन गटात विभागीय स्तरावरील लातूर येथे होणाऱ्या कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच गहिनीनाथ गोरख चौरे याचीही लातूर येथील जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशाबद्दल जीवाचीवाडी ग्रामस्थांच्या वतीने दोन्ही पैलवानांचा भव्य सत्कार करण्यात आला. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मारकाजवळ आयोजित कार्यक्रमात पैलवानांच्या वडिलांचा शाल, श्रीफळ व फेटा बांधून सन्मान करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित ह .भ . प . अण्णासाहेब काळे महाराज तसेच चंद्रकांत नरसिंग चौरे, सुभाष सारुक सुदाम चौरे चंद्रकांत नामदेव चौरे बाबासाहेब बांगर दिगंबर चौरे सतीश नागरगोजे आबासाहेब चौरे बबन पंढरी चौरे रामधन चौरे बाळासाहेब चौरे उपसरपंच सत्यनारायण चौरे मान्यवरांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन करताना तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे, इंटक जिल्हाध्यक्ष रामधणजी जमाले, जिल्हा सरचिटणीस मिलिंद मस्के, मधुसूदन मस्के, सखाराम बेंगळे आदी पदाधिकारी.

# संत आणि महापुरुषांचे विचार विसरल्यामुळे नैतिक अध:पतन -डॉ.श्रीपाल सबनीस

## कडा येथे जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

संत आणि महापुरुषांचे विचार आपण विसरत चालल्यामुळे समाजाचे मोठे नैतिक अध:पतन होत आहे.याच नैतिक घसरणीमुळे आज आपली लोकशाही धोक्यात आली आहे, असा परखड इशारा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.श्रीपाल सबनीस यांनी दिला.तसेच माजी आ.भीमराव धोंडे म्हणाले की, कष्ट आणि वेदनांतूनच वास्तववादी साहित्य जन्माला येते. साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी शेतकऱ्यांचे पाण्याचे प्रश्न सुटलेले नाहीत. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागाकडे वळवले पाहिजे असे धोंडे यांनी सांगितले.

साहित्यिकांनी केवळ पारंपरिक चौकटीत न अडकता नवीन भाषा,नवे तंत्रज्ञान आणि आधुनिक संशोधन आत्मसात केले पाहिजे.प्रमाण भाषेचे अवडंबर न माजवता, प्रत्येकाने आपल्याला भावणाऱ्या भाषेत निर्भयपणे व्यक्त झाले पाहिजे आणि साहित्यातील सांस्कृतिक दहशतवाद मोडून काढला पाहिजे. साहित्याचे तथाकथित



ठेकेदार आणि साहित्यात राजकारण करणाऱ्यांवर त्यांनी सडकून टीका केली.शेतकऱ्यांचे प्रश्न आणि वेदना साहित्यात याव्यातमराठवाड्याची भूमी ही धार्मिक एकात्मतेचे उत्तम उदाहरण आहे. प्रश्न, समस्या, दुःख आणि वेदना यातून निर्माण होणारे साहित्यच अधिक सकस आणि दीर्घायुषी ठरते. वरवरचे लेखन अल्पजीवी असते. त्यामुळे शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न आणि स्थानिक भवताल साहित्याचे मुख्य विषय झाले पाहिजेत,

**साहित्याचा आणि बीड जिल्ह्याचा अत्यंत घनिष्ठ संबंध**

असल्याचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा साहित्यिक संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.सतीश साळुंके यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (मुंबई) यांच्या अनुदानातून आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी द्वारा केला आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलना'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.शेतकऱ्यांच्या दुःखाला सरकार व समाजही जबाबदार आहे असे आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून भरवले जाणारे हे राज्यातील पहिलेच शेतकरी साहित्य संमेलन असावे.आज राज्यात दुष्काळाचे सावट असताना हे आयोजन अत्यंत समयोचित आहे. शेतकऱ्यांची मुले मंत्री-मुख्यमंत्री झाली, तरी बळीराजाच्या डोळ्यांतील अश्रू का थांबत नाहीत? शेतकरी आत्महत्या, कर्जबाजारीपणा आणि पाण्याचा अभाव या समस्या कायम का? या दुर्दैवी अवस्थेला व्यवस्थेसोबतच सरकार आणि आपण सर्व समाजही जबाबदार आहोत. असेही डॉक्टर सबनीस म्हणाले.संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा माजी आ.भीमराव धोंडे यांनी शेतकरी समस्यांवर बोट ठेवले. ते म्हणाले, कष्ट आणि वेदनांतूनच वास्तववादी साहित्य जन्माला येते. साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी शेतकऱ्यांचे पाण्याचे प्रश्न सुटलेले नाहीत. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागाकडे वळवले पाहिजे. नदीजोड प्रकल्प केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात कधी सुरू होणार? सरकारने शेतकऱ्यांना केवळ स्वप्ने न दाखवता योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी.जिथे दुःख वेदना असतात तिथेच साहित्य निर्माण होत असते. लेखक,कवी,साहित्यिक समाजाला चिंतनशील बनवतात.अत्यंत अचूक शब्दात मांडणी करणे हे साहित्यिकांचे कौशल्य असते आणि ते कौशल्य प्रत्येक लेखकाने कवीने आत्मसात केले पाहिजे. शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून शेतकरी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यावर शेतकऱ्यांच्या मुलांनीही साहित्य निर्मिती केली पाहिजे असेही धोंडे म्हणाले.आपल्या अध्यक्षीय भाषणात बीड जिल्ह्याचा समृद्ध ऐतिहासिक व साहित्यिक वारसा उलगडला. मराठवाड्यातील ताम्रपट आणि शिलालेख हे मराठी भाषेच्या विकासाचे साक्षीदार आहेत.आज शेतकऱ्यांच्या घामाला रास्त मोल मिळत नाही, यावर साहित्यिकांनी परखडपणे लिहिले पाहिजे. अलीकडे साहित्यिकांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येत असून सांस्कृतिक दहशतवाद मोडून काढण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. जो वास्तव जगतो आणि वाचून लिहितो, त्याचेच साहित्य चिरंतन टिकते असे ते म्हणाले.साहित्य आणि बीड जिल्ह्याचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. ज्या काळात कागदाचाही शोध लागला नव्हता, त्या सहाव्या शतकात मराठवाड्यात भूर्जपत्रावर साहित्यनिर्मिती झाली. राष्ट्रकूट, शालिवाहन आणि चालुक्य यांसारख्या राजवटींच्या काळात सापडलेले शिलालेख व ताम्रपट हे मराठी भाषेच्या समृद्ध विकासाचे जिवंत साक्षीदार आहेत असेही संमेलनाध्यक्ष अभ्यासक प्रा. डॉ.सतीश साळुंके यांनी केले.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस उपस्थित रहा:राजू जोगदंड

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने अडीच महिने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, मझर खान, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### बीडचे जनसंपर्क कार्यालय प्रत्यक्ष

सर्वांचे प्रश्न त्यांनी समजून घेतले. या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लगेच फोन करून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला.

**फेस टू फेस संवाद** :जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडे आलेल्या प्रत्येकाची समस्या नीट ऐकून घेत त्यावर लगेच तोडगा काढून फोन करतात, त्यांची ही शैली पाहून आपल्या समस्यांची गाऱ्हाणी घेऊन आलेल्या जनतेच्या चेहर्यावर समाधानाचे भाव उमटत होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं, फोन केला, आमचं काम झालं,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. काही नागरिकांनी सांगितलेले काम झाल्याबद्दल पेढे घेऊन ना. पंकजाताईंचे आभार देखील यावेळी मानले.

### स्व. केशरकाकू क्षीरसागर

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने मरणोत्तर सन्मान देण्यात आला.स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, सहसचिव रवि उबाळे, विष्णुदास बियाणी, शिवाजी जाधव, मंगेश लोळगे, अरुण डाके, विलास बडगे व समितीचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन झाले.

### पाच टर्म आमदार

हीच त्यांच्या नेतृत्वाची मोठी पावती आहे. त्यामुळे केवळ राजकीय द्वेषातून अथवा प्रसिद्धीसाठी करण्यात येणारे बिनबुडाचे आरोप भाजपा कार्यकर्ते आणि जनता खपवून घेणार नाही, असा इशाराही विष्णू खाडे यांनी दिला.

'संकटाच्या काळात धस यांचा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा'

बीड जिल्ह्यातील शेतकरी आणि पशुपालकांसमोरील अडचणी कमी करण्यासाठी शासनाकडून आवश्यक मदत मिळावी, यासाठी आमदार धस सातत्याने पाठपुरावा करत आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीत शासनाने शेतकरी व सर्वसामान्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळे अशा संवेदनशील काळात राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा जनतेला प्रत्यक्ष मदत कशी मिळेल, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही खाडे यांनी स्पष्ट केले.आमदार सुरेश धस यांच्यावर टीका करणाऱ्यांनी प्रथम त्यांच्या मतदारसंघातील जनसंपर्क, विकासकामांचा पाठपुरावा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी केलेले प्रयत्न तपासावेत. तथ्यांच्या आधारे टीका करावी; मात्र बिनबुडाचे आरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करू नये, असा स्पष्ट इशारा भाजपा उपाध्यक्ष विष्णू खाडे यांनी दिला.

### दुष्काळाच्या प्रश्नांवर

रक्कम साखर कारखान्यांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना द्यावी.

जनावरांसाठी चारा छावण्या किंवा दावणीवर चारा उपलब्ध करून द्यावा.

ऊसाला ४,००० रुपये प्रतिटन भाव द्यावा.

परिषद संपल्यानंतर उपस्थित शेतकरी मोर्चाच्या स्वरूपात दिंद्रुड पोलीस ठाण्यात गेले.यावेळी तहसील प्रशासनाचे प्रतिनिधी चव्हाण तसेच पोलीस उपनिरीक्षक उगले यांनी शेतकऱ्यांचे निवेदन स्वीकारले. निवेदनाद्वारे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी करण्यात आली.या दुष्काळ परिषदेला सुभाष मायकर,हनुमान फफाळ,लक्ष्मण सोळंके,संजय शिंदे,राज झोडगे, पृथ्वीराज ठोंबरे, राम मस्के यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहावे; अन्यथा आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

### आधार वृद्धाश्रमाला आ.धस

दानशूर व्यक्तींच्या मदतीतून इतकी वर्षे हे सेवाकार्य सुरू ठेवणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब असल्याचे धस म्हणाले.वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना आ. सुरेश धस भावुक झाले. आयुष्यभर कुटुंबासाठी आणि समाजासाठी योगदान दिलेल्या ज्येष्ठांना वृद्धापकाळात प्रेमाचे दोन शब्द, आपुलकीची साथ आणि सन्मानाची वागणूक मिळणे आवश्यक आहे. ज्येष्ठांची सेवा करणे आणि त्यांना आधार देणे हीच खरी माणुसकी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.निराधार ज्येष्ठांची अखंड सेवा करणारे सर्जेराव देशमुख यांच्या कार्याचे आ. धस यांनी विशेष कौतुक केले. यावेळी देशमुख यांचा सत्कार करून त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच भविष्यात आधार वृद्धाश्रमाला आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही आ. धस यांनी दिले.

# आरटीओ साहेब रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी अधिकृत रिक्षा चालकांची नियुक्ती करावी

बीड । प्रतिनिधी

सध्या बीड ते पुणे रेल्वे सुरू झाली असून शहरांमधून बीड रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी अनेक रिक्षावाले बेसुमार नागरिकांकडून भाडे घेत असून आपली पोळी भाजत आहेत अनेक प्रवाशांच्या हातातील अंगठ्या पैसे पाकीट पैसे भामटे रिक्षावाले चोरटे हिसकावून घेत आहेत रात्रीच्या वेळी काढून घेत असल्याचे सध्या समोर येत आहे याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे आरटीओ साहेब यांनी बीड शहरातील अधिकृत रिक्षावाल्यांना बॅच बिल्ले देऊन पास देऊन त्यांना ड्रेस देऊन असे पंचवीस पास रिक्षावाल्यांना देऊन २५ रिक्षावाल्यांचे



अधिकृतपणे त्यांच्या गळ्यामध्ये आयडी कार्ड देऊन रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी व्यवस्था करावी असे प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील केले आहे तसेच बीड जिल्हा वाहतूक शाखेचे वैभव पाटील साहेब यांनी देखील आपले कर्तुत्व अतिशय उत्कृष्टपणे वाहतूक शाखेच्या माध्यमातून संपूर्ण बंद बीड जिल्ह्यामध्ये वाहतूकची शिस्त काय असते ते दाखवून दिले आहे म्हणून परत एकदा त्यांनी देखील या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे त्यांनी देखील बीड शहरांमधून रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या रिक्षा वाल्यांच्या बाबतीमध्ये ते किती भाडे घेतात कशाप्रकारे प्रवाशांना टार्गेट करतात हे पाहणे देखील गरजेचे आहे असे देखील प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून नवनाथ अण्णा यांनी सांगितले आहे.

# माजलगाव ग्रामीण रुग्णालयात मोफत रक्त तपासण्या बंद?

## दुष्काळाच्या काळात रुग्णांना खासगी प्रयोगशाळांचा आर्थिक भुर्दंड; सर्व तपासण्या तातडीने सुरू करा : नुमान चाऊस

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील व्हिटॅमिन डी-३, बी-१२, सीआरपीसह काही महत्त्वाच्या रक्त तपासण्या बंद असल्याने सर्वसामान्य व गरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे नागरिक आधीच आर्थिक संकटात असताना मोफत तपासण्या बंद असल्याने रुग्णांना खासगी प्रयोगशाळांमध्ये तपासण्या करून घ्याव्या लागत आहेत. ग्रामीण भागातील गरीब रुग्णांवर हा अतिरिक्त आर्थिक भार पडत असून शासनाच्या मोफत आरोग्यसेवेचा उद्देश बाधित होत असल्याची भावना आहे. वरिष्ठ स्तरावरून काही तपासण्या बंद करण्याबाबत सूचना मिळाल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे



वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश सावळे यांनी सांगितले आहे. दुष्काळाच्या काळात गरीब रुग्णांना आणखी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागू नये, यासाठी माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील सर्व बंद रक्त तपासण्या तातडीने सुरू कराव्यात तसेच तपासण्या बंद ठेवण्यामागील कारण प्रशासनाने स्पष्ट करावे, अशी मागणी मौलाना आझाद युवा मंच, बीडचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.सदर मागणीची तातडीने दखल घेऊन बंद असलेल्या सर्व तपासण्या सुरू न केल्यास, मौलाना आझाद युवा मंचच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी दिला आहे.

# जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण प्रभावीपणे राबविण्याचे प्रशासनाचे आवाहन; शुद्ध व सुरक्षित पाण्यावर भर

बीड। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक पाणीपुरवठा स्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता, सुरक्षितता आणि पाणी गुणवत्तेचे नियमित परीक्षण करून संभाव्य आरोग्य धोके टाळण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता, सुरक्षितता व पाणी गुणवत्तेचे नियमित परीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक स्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण नियमितपणे हाती घेण्यात येते. या सर्वेक्षणातून पाणीपुरवठा स्रोत, परिसर तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेतील संभाव्य त्रुटी व जोखीम वेळीच ओळखणे आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे सुलभ होते.

जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले जात असून, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर या सर्वेक्षणाची मुख्य जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सर्वेक्षणामध्ये आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षक यांच्या संयुक्त सहभागातून पाणीपुरवठा स्रोतांची कसून पाहणी केली जाते. तसेच ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांचा, विशेषतः महिला सदस्यांचा सक्रिय सहभाग घेण्याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

पाणी स्रोतांचे जोखमीनुसार शास्त्रीय वर्गीकरण

स्वच्छता सर्वेक्षणातून प्राप्त गुणांकनाच्या आधारे पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे तीव्र जोखीम, मध्यम जोखीम आणि सौम्य किंवा कमी जोखीम अशा तीन प्रमुख वर्गांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. यामध्ये ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक जोखीम असल्यास तीव्र जोखीम, ३१ ते ६९ टक्के जोखीम असल्यास मध्यम जोखीम, तर ० ते ३० टक्के जोखीम असल्यास सौम्य किंवा कमी जोखीम मानली जाते. या मूल्यांकनानुसार संबंधित ग्रामपंचायतींना अनुक्रमे लाल, पिवळे आणि हिरवे कार्ड प्रदान करण्याची यंत्रणा कार्यान्वित आहे.

लाल व पिवळ्या कार्डधारक ग्रामपंचायतींवर विशेष प्रशासकीय लक्ष

पाणी शुद्धीकरण अनियमित असणे, पाणी स्रोताचा परिसर अस्वच्छ असणे, पाईपलाईन किंवा टाकीमध्ये गळती असणे, आवश्यक प्रमाणात टी.सी.एल.चा साठा उपलब्ध नसणे तसेच जलजन्य आजारांचा उद्रेक यांसारख्या बाबी आढळल्यास संबंधित ग्रामपंचायतीला उच्च जोखीम म्हणून विचारात घेतले जाते. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर लाल व पिवळे कार्ड प्राप्त ग्रामपंचायतींचा तालुकास्तरावर सखोल आढावा घेऊन आढळलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी तातडीने मार्गदर्शन केले जाते. तीव्र व मध्यम जोखीम असलेल्या पाणी स्रोतांबाबत एका महिन्याच्या आत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ग्रामपंचायतींसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.

ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सरपंच, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, जलसुरक्षक व संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यामार्फत नियमित पाठपुरावा व सनियंत्रण केले जात असून, याद्वारे ग्रामीण भागातील जलजन्य आजारांना प्रभावीपणे आळा बसत आहे.

सलग पाच वर्षे हिरवे कार्ड मिळविणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव

ज्या ग्रामपंचायतीमध्ये सलग पाच वर्षे जलजन्य साथीचा उद्रेक झालेला नाही आणि सलग पाच वर्षे हिरवे कार्ड प्राप्त झाले आहे, अशा आदर्श ग्रामपंचायतींना दोन्ही निकष पूर्ण झाल्यानंतर विशेष चंदेरी कार्ड प्रदान करण्यात येते. अशा ग्रामपंचायतींमधील ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षक यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्याची स्तुत्य तरतूद या अभियानांतर्गत करण्यात आली आहे.

नियमित सर्वेक्षण व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाला प्राधान्य

राज्याच्या धोरणानुसार दरवर्षी पावसाळ्यापूर्वी म्हणजेच १ एप्रिल ते ३० एप्रिल तसेच पावसाळ्यानंतर २ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता सर्वेक्षण मोहीम राबविण्याची प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. जलसुरक्षक, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक व संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना या सर्वेक्षणाचे शास्त्रीय प्रशिक्षण देण्याचे आदेश देण्यात आले आहेत, जेणेकरून सर्वेक्षणाचा दर्जा उंचावेल.

नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

पिण्याचे पाणी हे थेट नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्याने ग्रामपंचायती, आरोग्य विभाग, जलसुरक्षक तसेच सर्वसामान्यांनी पाणी स्रोतांच्या स्वच्छतेबाबत सदैव सतर्क राहणे गरजेचे आहे. पाणी स्रोताभोवती अस्वच्छता होऊ नये, सांडपाणी साचू नये, पाणीपुरवठा यंत्रणेत गळती राहू नये तसेच पाण्याचे नियमित निर्जंतुकीकरण व आवश्यक तपासणी केली जावी, यासाठी सर्वांनी सामूहिक सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास प. गंडाळ यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने केले आहे. ''स्वच्छ पाणी - निरोगी समाज'' या उदात्त ध्येयासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे शासकीय निवेदनात म्हटले आहे.

cmyk
राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि.५ ऑक्टोबर २०२६


# शेतकऱ्याच्या मागं तगादा लावायचा नाही!
## चंद्रशेखर बावनकुळेंची बँक अधिकाऱ्यांना सूचना



संभाजीनगर / प्रतिनिधी

राज्यसरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून सध्या दुष्काळी पंचनामे सुरू असून कुठल्याही शेतकऱ्याची शेतमजुराची अडवणूक होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश महसूल मंत्री व दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. विशेषतः राष्ट्रीयकृत बँकेपासून डीसीसी बँक, पतसंस्था, प्रायवेट बँका कुठल्याच बँकेने शेतकऱ्याच्या मागे तगादा लावायचा नाही. या काळात सावकारांनी जर शेतकऱ्याला लुटलं तर सरकार त्याला सोडणार नाही असा इशाराच बावनकुळे यांनी दिला. दुष्काळी पंचनामे आणि सरसकट मदतीवरही ते बोलले. छत्रपती संभाजीनगरमध्ये ते बोलत होते.

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अचूक पंचनामे व्हावेत, कारण दुष्काळ तर जाहीर झाला आहे. २६५ तालुके आणि आज-उद्या काही तालुके जोडणार आहोत. पण सर्वांनी अचूक पंचनामे करण्याकरिता पुढाकार घ्यावा, कुठेही चूक होऊ नये, अशा सूचना मुख्यमंत्री महोदयांनी सर्वच मंत्र्यांना दिल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं 'ग्रामविकास विभाग, कृषी विभाग आणि महसूल विभाग या तिन्ही विभागांमध्ये या ठिकाणी पंचनाम्यावर काम होणार आहे आणि लवकरच आपल्याला शेतकऱ्याला मदत करायची आहे, याकरिता आमचं सरकार काम करणार आहे. 'शेतकऱ्याच्या या दुष्काळी परिस्थितीमध्ये सोबतच पिण्याच्या पाण्याचं नियोजन महत्त्वाचं आहे, जनावरांच्या चाऱ्याचं नियोजन महत्त्वाचं आहे, पुढच्या काळामध्ये जलसंधारण... या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे जे काही आपल्याकडे साठे आहेत त्याला पुन्हा एकदा मजबूत करायचं आहे. आणि मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी शेतकरी-शेतमजूर त्याला कुठल्याही पद्धतीची अडवणूक होणार नाही याची काळजी घ्यायची आहे. ' असेही बावनकुळे म्हणाले. बँका कुठल्याही पद्धतीने, बँकांचं जे काही वागणं आहे, ते वागणं योग्य नाही असं मला आता कळालेलं आहे. मी या ठिकाणी आपल्या माध्यमतनं सर्व बँकांना सांगणार आहे, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे, कुठल्याही बँकेने पतसंस्थेपासून ते डीसीसी बँक, राष्ट्रीयकृत बँकेपासून ते प्रायव्हेट बँका कोणीही शेतकऱ्याच्या मागे तगादा लावायचा नाही. सावकारांनी शेतकऱ्यांना लुटायचं नाही. सावकारांनी जर शेतकऱ्यांना लुटलं तर सरकार सोडणार नाही, असा इशारा मंत्री बावनकुळे यांनी दिला.

या दुष्काळाला सर्वच पक्षांनी- विरोधी पक्ष, सत्ताधारी पक्षांनी एकत्र येऊन टीका-टिप्पणी न करता सर्वांची जबाबदारी शेतकरी-शेतमजूरला मदत करायची आहे. १८ पगड जाती, १२ बलुतेदार हा असलेला शेतकरी, या शेतकऱ्याला आम्ही... प्रचंड दुष्काळामध्ये अडकलेला शेतकरी बाहेर काढण्याकरिता आम्ही काम करतोय. पंचनामा एवढ्याकरता असतं की एनडीआरएफ जे असतं, केंद्र सरकारचे जे निकष आहेत, त्याची मदत नंतर येते राज्याला, पण निकष द्यावे लागतात. जर निकषात आपण बसलो नाही, तर केंद्राची येणारी जी मदत आहे, त्याचा पूर्ण बोजा राज्याला पडतो. राज्य तर पूर्ण मदत करणार आहे. आज राज्य केंद्राची वाट बघणार नाही. पण ट्रिगर १ मध्ये येणे, ट्रिगर २ मध्ये येणे हे बसवावं लागतं, तर केंद्र सरकारची जी त्या ठिकाणी टीम येते, त्यालाही संपूर्ण रेकॉर्ड द्यावा लागतो, त्याचे त्या ठिकाणी ड्रोन सर्व्हे द्यावे लागतात, पंचनाम्याचे रिपोर्ट द्यावे लागतात, तेव्हा केंद्राची मदत येते. आणि केंद्राची मदत मिळणं हे राज्याकरिता महत्त्वाचं असतं, म्हणून पंचनामे करावे लागतात.' ते पुढे म्हणाले, 'पंचनामे अचूक व्हावे. कुठल्याही पद्धतीने... कधी कधी काय वर हिरवं दिसतं, खाली काही नाही आहे. म्हणजे कापसूच परवा बघितला वर हिरवा आहे, कारण तेव्हा पाऊस पडल्यामुळे किंवा जमिनीतलं आपल्या शेतातलं पाणी दिल्यामुळे तो हिरवा आहे. पण खाली बोंडच नाहीये कापसाला. त्यामुळे मला असं वाटतं हा घोळ होऊ नये. हा घोळ आपल्या शेतकऱ्याला त्याठिकाणी अडचणीत आणणारा आहे आणि म्हणून पंचनामे अचूक व्हावे.'




### महत्वाच्या घटना

१८६४ : तीव्र चक्रीवादळामुळे कोलकाता शहराचा नाश झाला, सुमारे ६०,००० लोकांचा मृत्यू झाला.
१८७७ : वायव्य युनायटेड स्टेट्समधील नेझ पेर्स युद्ध समाप्त झाले.
१९१० : पोर्तुगालमधील राजेशाही संपली आणि ते प्रजासत्ताक बनले.
१९४८ : अश्गाबात भूकंपात सुमारे ११०,००० लोकांचा मृत्यू झाला.
१९५५ : पंडित नेहरूंच्या हस्ते हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याचे उद्घाटन झाले. भारताच्या औद्योगिक विकासात या कारखान्याचे स्थान महत्त्वाचे मानले जाते.
१९६२ : डॉ. नो हा पहिला जेम्स बाँड चित्रपट प्रदर्शित झाला.
१९८९ : मीरासाहेब फातिमा बीबी सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश बनल्या.
१९९५ : कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा जनस्थान पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांना जाहीर झाला.
१९९८ : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९० : 'किशोरीलाल घनश्यामलाल मशरुवाला' – तत्त्वज्ञ व हरिजन चे संपादक यांचा जन्म.
१९२२ : 'यदुनाथ' – थत्ते लेखक, संपादक यांचा जन्म. (मृत्यू : १० मे १९९८)
१९२२ : 'शंकरसिंग रघुवंशी' – शंकर-जयकिशन या जोडीतील संगीतकार यांचा जन्म. (मृत्यू : २६ एप्रिल १९८७)
१९२३ : 'कैलाशपती मिश्रा' – गुजरातचे राज्यपाल यांचा जन्म. (मृत्यू : ३ नोव्हेंबर २०१२)
१९३२ : 'माधव आपटे' – भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
१९३६ : 'वक्लाव हेवल' – चेक रिपब्लिकचे पहिले अध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू : १८ डिसेंबर २०११)
१९३९ : 'वॉल्टर वुल्फ' – वॉल्टर वुल्फ रेसिंग चे संस्थापक यांचा जन्म.
१९६४ : 'सरबिंदू मुखर्जी' – भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
१९७५ : 'केट विन्स्लेट' – ब्रिटीश अभिनेत्री यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२७ : 'सॅम वॉर्नर' – वॉर्नर ब्रदर्स चे सहसंस्थापक यांचे निधन. (जन्म : १० ऑगस्ट १८८७)
१९२९ : 'वर्गीस पायिपिल्ली पलक्कुप्पली' – भारतीय पुजारि यांचे निधन. (जन्म : ८ ऑगस्ट १८७६)
१९८१ : 'भगवतीचरण वर्मा' – पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित हिन्दी लेखक यांचे निधन. (जन्म : ३० ऑगस्ट १९०३)
१९८३ : 'अर्ल टपर' – टपरवेअर चे संशोधक यांचे निधन. (जन्म : २८ जुलै १९०७)
१९९० : 'राजकुमार वर्मा' – नाटककार, समीक्षक व छायावाद परंपरेतील हिन्दी कवी, पद्मभूषण यांचे निधन. (जन्म : १५ सप्टेंबर १९०५)
१९९१ : 'रामनाथ गोएंका' – इन्डियन एक्सप्रेस वृत्तपत्रसमुहाचे संस्थापक यांचे निधन. (जन्म : ३ एप्रिल १९०४)
१९९२ : 'बॅ. परशुराम भवानराव पंत' – नामवंत मुत्सद्दी, पद्मश्री यांचे निधन.
१९९७ : 'चित्त बसू' – संसदपटू, फॉरवर्ड ब्लॉक चे सरचिटणीस यांचे निधन. (जन्म : २५ डिसेंबर १९२६)
२०११ : 'स्टीव्ह जॉब्ज' – ॲपल कॉम्प्युटर्सचे संस्थापक यांचे निधन. (जन्म : २४ फेब्रुवारी १९५५)

# रब्बीत कमी पाण्यात कोणती पिकं घ्यावीत ? कृषी तज्ज्ञांनी दिला सल्ला



परभणी : मराठवाड्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे (ꣻीसहीं)खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले आहे.आता रब्बी हंगामासमोरही पाण्याचे मोठे संकट उभे आहे. पावसाअभावी सोयाबीन (ꣻूलशरप) काढणीतून काहीच निघणार नसल्याने अनेक शेतकऱ्यांवर पिकावर रोटावेटर फिरवण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे सोयाबीन बाजारात येण्याआधीच त्याचे दर कमी झाले आहेत. त्यामुळे आता रब्बी हंगामात (ठरललळ) शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊनच पीक नियोजन करावे, असा सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी दिला आहे.

नेमके शेतकऱ्यांनी कमी पाण्यात चारा आणि उत्पन्नासाठी कोणती पिके घ्यावीत याबाबत परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान शास्त्र विभाग प्रमुख डॉ कैलास डाखोरे यांनी 'एबीपी माझा'ला सांगितले आहे. ते म्हणाले, सध्या मराठवाड्यात पाण्याची उपलब्धता हा रब्बी पीक निवडीचा मुख्य निकष असणार आहे.ज्या शेतकऱ्यांकडे मर्यादित पाणी उपलब्ध आहे,त्यांनी रब्बी ज्वारी,बाजरी,करडई आणि हरभरा यांसारख्या पिकांचा विचार करावा.विद्यापीठाच्या सध्याच्या कृषी हवामान सल्ल्यानुसार पाण्याची उपलब्धता असल्यास रब्बी ज्वारी, करडई,बाजरी आणि हरभऱ्याची पेरणी करता येऊ शकते. कोरडवाहू हरभरा आणि करडईसाठी जमिनीतील उपलब्ध ओलावा महत्त्वाचा ठरणार आहे. राज्यातील मोठ्या भागात दुष्काळ (ꣻीसहीं) सदृश्य स्थिती निर्माण झाली असून त्याचा थेट फटका आता शेतकऱ्यांना बसतो आहे. मोठ्या कष्टानं पिकवलेली पिकं पाण्याअभावी करपून गेली आहे. तर दुष्काळाचं सावट आगामी काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. काही महिन्यात भीषण चारा टंचाई होण्याचीही शक्यता आहे. वर्षानुवर्षे पोसलेले जनावरे या संकटात कशी जगवायची असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. या पार्श्वभूमीवर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने चारा टंचाईच्या बाबतीत काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. मराठवाड्याच्या अनेक भागामध्ये कमी पाऊस झाल्यामुळे भविष्यात पशुधनासाठी चारा टंचाई भासू शकते. यासाठी रब्बी हंगामामध्ये ज्वारीसारखे पीक घेऊन कडबा उत्पादन करणे गरजेचे आहे. रब्बी ज्वारी पिकाच्या पेरणीसाठी पूर्व मशागतीची कामे करून घ्यावीत व पाण्याची उपलब्धता असल्यास रब्बी ज्वारी पिकाची पेरणी करून घ्यावी. रब्बी ज्वारी पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात (१ ते १५ ऑक्टोबर) करावी. असेही तज्ञ समितीने केलेल्या शिफारशीत म्हटले आहे.

# जनावरांसाठी जीवघेणा 'घटसर्प' आजार, वेळीच करा हे उपाय!



जनावरात घटसर्प आजाराचा प्रसार बऱ्याच वेळा दिसून येतो यामुळे जनावरे दगावली आहेत. घटसर्प या आजाराला हेमोरॅजिक सेप्टिसिमिया तसेच डिप्थीरिया या नावाने सुद्धा ओळखतात. वातावरणातील बदलाचा परिणाम हा जनावरांवर देखील पाहवयास मिळतो. पावसाळ्याच्या तोंडावर घटसर्प ह्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. विशेषतः गाई आणि म्हशीमध्येच याची लक्षणे आढळतात. शिवाय हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा फैलावही लवकर होतो. यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याचाही धोका असतो. त्यामुळे वेळीच लसीकरण करुन घेणे हाच यामधील सर्वोत्तम पर्याय आहे.

घटसर्प रोगाच्या प्रादुर्भावाची कारणे :पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी हा आजार अधिक प्रमाणात आढळतो. शिवाय अस्वच्छ असलेल्या ठिकाणी जनावरे बांधली किंवा लांबचा प्रवास किंवा अतिकाम करून थकलेल्या प्राण्यांवर या आजाराचे जीवाणू हल्ला करतात. रोगाचा प्रसार खूप वेगाने होतो. आजारी जनावरांचा चारा, धान्य आणि पाणी यांचे सेवन आणि इतर जनावरे संपर्कात आली तर हा आजार होतोच तसेच मादी प्राण्याच्या दुधाने त्याचा प्रसार होतो.

घटसर्प आजाराची लक्षणे :जनावरांना तीव्र ताप येतो, सुमारे १०५ ते १०६ डिग्री फॅ. पर्यंत हा ताप जातो. डोळे लाल आणि सुजलेले दिसतात, नाक, डोळे आणि तोंडातून स्राव वाहतो. मान, डोके किंवा पुढील पायांच्या दरम्यान सूज येते. श्वास घेताना पुटपुटण्याचा आवाज येतो, श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरून जनावरांचा मृत्यू सुद्धा होतो.

घटसर्प आजारावर उपचार :या आजारावर त्वरित उपचार करणे गरजेचे आहे. अन्यथा जनावराचा यामध्ये मृत्यूही होऊ शकतो. घटसर्पची लक्षणे आढळून आल्यास लागलीच पशूवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य ती उपाययोजना करावी. जनावरांना दरवर्षी पावसाळ्यापूर्वी आजाराची लस जवळच्या पशुवैद्यक दवाखान्यात द्यावी. पावसळ्यापूर्वी लसीकरण करणे गरजेचे आहे. जनावरांना घटसर्प आजाराची लक्षणे दिसताच बाधित जनावरांना इतर निरोगी प्राण्यांपासून जनावर वेगळे करावे. आजारी जनावरांना नदी, तलाव, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी पिऊ देऊ नका. बाधित जनावराच्या आधी निरोगी जनावरांना चारा, धान्य, पाणी इत्यादी द्यावे.

# कोंबड्यांसाठी 'स्टिंबायोटिक' पूरक खाद्याची निर्मिती



काकडी पिकावरील थ्रिप्स पाल्मी

सद्यःस्थितीत पोषक हवामानामुळे काकडी पिकावर थ्रिप्स पाल्मी आणि थ्रिप्स पर्विस्पिनस (ब्लॅक थ्रिप्स), या फुलकिडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या लेखात थ्रिप्स पाल्मी या किडीची ओळख जाणून घेऊया. ही कीड पानांच्या खालच्या बाजूस आणि कोवळ्या भागांवर राहून रस शोषते. परिणामी, पानांवर चंदेरी चट्टे पडतात, शेंड्यांची वाढ खुंटते आणि फळांच्या प्रतिवर परिणाम होतो. यजमान पिके : ही बहुभक्षी फुलकीड असून, प्रामुख्याने कुकुरबिटेसी आणि सोलॅनेसी कुळातील पिकांवर आढळते. उदा. काकडी, खरबूज, कलिंगड, कारले, दुधी भोपळा, दोडका, भोपळा, वांगी, मिरची, टोमॅटो, बटाटा, इ.

किडीची ओळख

अंडी : अंडी अतिशय सूक्ष्म, लांबट ते मूत्रपिंडाकृती, पारदर्शक ते फिकट पांढरी आणि गुळगुळीत आवरणाची असतात. लांबी सुमारे ०.४४ मि.मी., रुंदी सुमारे ०.१५ मि.मी. मादी ही अंडी पानांच्या ऊतींमध्ये घालते, त्यामुळे ती डोळ्यांना सहजासहजी दिसत नाहीत.अळी : अंड्यातून बाहेर पडलेल्या अळ्या लहान, लांबट आणि फिकट पिवळसर असतात. त्यांना पंख नसतात. तीन जोड्या पाय असतात. शरीराचे डोके, वक्ष व उदर हे भाग स्पष्ट दिसतात. अळी अवस्था दोन टप्प्यांची असते, दुसऱ्या टप्प्यातील अळ्या आकाराने मोठ्या असतात.

कोषावस्था : दुसरी पिलावस्था संपल्यावर कीड जमिनीत किंवा पालापाचोळ्यात सुरक्षित जागी जाते. पूर्वकोषावस्थेत शरीर फिकट पिवळसर असते. पंखांच्या कळ्या तयार होऊ लागतात आणि स्पर्शक पुढे पसरलेले असतात. कोषावस्थेत पंखांच्या कळ्या अधिक विकसित होतात आणि स्पर्शक डोक्याच्या मागे वळलेले असतात. या दोन्ही अवस्थांत कीड अन्न घेत नाही.

प्रौढ अवस्था : प्रौढ कीड ०.८ ते १.० मि.मी. लांब, फिकट पिवळसर ते पांढरट, लांबट आणि निमुळत्या शरीराची असते. पंखांच्या दोन जोड्या असून, त्यांच्या कडांवर केसांसारख्या झालरी असतात. डोळे लालसर असतात. डोक्यावर तीन साधे डोळे त्रिकोणी रचनेत दिसतात. मादी नरापेक्षा किंचित मोठी असते. प्रजातीची अचूक ओळख करण्यासाठी पंख, डोके आणि शरीरावरील सूक्ष्म वैशिष्ट्ये सूक्ष्मदर्शकाखाली तपासावी लागतात.

जीवनक्रम कसा पूर्ण होतो?

थ्रिप्स पाल्मी या प्रजातीचा जीवनक्रम अंडी, दोन अळी अवस्था, पूर्वकोष, कोष आणि प्रौढ अशा अवस्थांतून पूर्ण होतो. मादी पानांच्या उतींमध्ये अंडी घालते. साधारण ४ दिवसांत अळ्या बाहेर पडतात. दोन्ही अळी अवस्था अनुक्रमे ३ व २ दिवसांत पूर्ण होतात. त्यानंतर जमिनीतील किंवा पाला-पाचोळ्यातील सुरक्षित जागेत पूर्वकोष व कोष अवस्था पूर्ण होतात. या अवस्था अनुक्रमे ३ व ४ दिवस टिकतात. अशा प्रकारे अंड्यापासून प्रौढ होण्यासाठी साधारण १० ते १३ दिवस लागतात. मात्र तापमान व वातावरणातील बदलांनुसार हा कालावधी कमी-जास्त होऊ शकतो.

पिकाचे नुकसान कसे होते?

पिले आणि प्रौढ दोन्ही काकडीच्या पानांवर व कोवळ्या शेंड्यांवर पृष्ठभाग खरवडून रस शोषतात. त्यामुळे पानांवर चंदेरी ठिपके, खरचटल्यासारखे व्रण आणि तपकिरी डाग पडतात. प्रादुर्भाव वाढल्यास पाने आकसतात, कडा खाली वळतात आणि शेंड्यांची वाढ खुंटते. वेलीची एकूण वाढ मंदावते. फुलोरा व फळधारणेच्या काळात प्रादुर्भाव झाल्यास कोवळ्या फळांवर खरचटल्यासारखे चट्टे पडतात. फळांची वाढ खुंटते आणि आकार विकृत होतो. तीव्र प्रादुर्भावात फळांची प्रत आणि विक्रीयोग्य उत्पादन घटते. एकूण उत्पादन, फळांची संख्या आणि सरासरी वजन कमी होण्याची शक्यता असते.

# सप्टेंबर महिन्यात सहजपणे लावता येणाऱ्या भाज्या !

सप्टेंबर महिन्यात हवामानात होणाऱ्या बदलांमुळे अनेक प्रकारच्या भाज्यांची लागवड करण्यासाठी हा काळ अत्यंत उपयुक्त मानला जातो. या महिन्यात पेरणी केल्यास हिवाळ्याच्या सुरुवातीलाच तुम्हाला घरच्या घरी ताजी आणि सेंद्रिय भाजीपाला उपलब्ध होतो.पालक : सप्टेंबर महिन्यात पालकाची लागवड करणे अतिशय सोपे असते. ही भाजी ३० ते ४० दिवसांत काढणीस तयार होते.

मेथी: हिवाळ्यातील लोकप्रिय भाजी असून ती कुंडीत किंवा बागेत सहज उगवते.मुळा : मुळ्याची पेरणी सप्टेंबरमध्ये केल्यास हिवाळ्यात पांढरे आणि रसाळ मुळे तयार होतात.गाजर : लाल आणि गोड गाजराच्या पेरणीसाठी सप्टेंबर-ऑक्टोबर हा सर्वोत्तम काळ आहे.मटार / मटारच्या शेंगा : हिवाळ्यात ताज्या मटारचा आस्वाद घेण्यासाठी सप्टेंबरच्या उत्तरार्धात मटारची पेरणी सुरू करता येते.कोबी आणि फ्लॉवर : या भाज्यांची रोपे (डरश्रिळपसी) या महिन्यात लावून हिवाळ्यात मोठे आणि ताजे गट्टे मिळवता येतात.मेथी, कोथिंबीर आणि शेपू : कोथिंबीर आणि शेपू या पालेभाज्यांची लागवडही या काळात उत्तम प्रकारे होते.लागवडीसाठी काही महत्त्वाच्या टिप्सकुंडीची किंवा मातीची निवड: पाण्याचा योग्य निचरा होणारी माती वापरावी. मातीत ५०% शेतमाती आणि ५० गांडूळ खत किंवा वर्मी कंपोस्ट मिसळावे.सूर्यप्रकाश: रोपांना रोज किमान ४ ते ५ तास चांगला सूर्यप्रकाश मिळेल अशा ठिकाणी कुंडी ठेवावी. पाणी देणे: मातीतील ओलावा पाहूनच पाणी द्यावे; जास्त पाणी दिल्यास मुळे सडू शकतात.

cmyk

# पाथर्डीचा पूर्व भाग पाण्यावाचून तहानलेला असताना ताजनापुर प्रकल्पावरुन राजकीय सौदेबाजी कशाला?

प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी : दुष्काळाने पाथर्डी तालुका व पूर्व भाग (भगवानगड परिसर) दुष्काळाने व पाणीटंचाईने पूर्णतः होरपळलेला असताना व पाणीटंचाई तीव्र निर्माण झालेली असताना पैठण जायकवाडी धरणातून ताजनापुर प्रकल्प टप्पा तीन पाथर्डीच्या पूर्व भागातील भगवानगड परिसराला पाणी देण्यासाठी (ताजनापूर प्रकल्प लिफ्ट क्रमांक तीन) यास शेवगावकरांनी तीव्र विरोध दर्शवणे किंवा राजकीय सौदेबाजी करणे यामुळे भगवानगड परिसरात संतापाची लाट निर्माण झाली आहे.

पैठणच्या नाथ सागर जायकवाडी जलाशयातून महत्वकांक्षी ताजनापूर प्रकल्पाचे दोन टप्पे व त्यात समाविष्ट असणाऱ्या शेवगावातील गावांना प्राधान्याने ३.८ टीएमसी पाणी देण्याचे प्रस्तावित असताना पाथर्डीच्या पूर्व भागात २७ गावांना टप्पा क्रमांक तीन मध्ये पिण्यासाठी व शेती सिंचनासाठी पाणी मिळाल्यास नेमका विरोध असण्याचे कारण काय व यावरून कोण राजकारण करू पाहत आहे हे न समजण्यापलीकडे आहे ताजनापुर टप्पा क्रमांक एक १९ कोटी रुपये निधी टप्पा क्रमांक दोन २५० कोटी रुपये निधी व नुकत्याच शेवगाव येथे झालेल्या दुष्काळग्रस्त टंचाई आढावा बैठकीत भगवानगड परिसरातील जवळपास २७ गावातील गावकऱ्यांनी शेतकऱ्यांनी पालकमंत्री



राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असता पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ताजनापुर टप्पा क्रमांक तीन प्रकल्प पूर्णत्वासाठी पाथर्डीच्या पूर्व भागातील २७ गाव भगवानगड परिसराला पिण्याचे व सिंचनासाठी पाणी देण्याच्या उद्देशाने ताजनापुर टप्पा क्रमांक तीन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्याचे आदेश देऊन तातडीने ताजनापुर प्रकल्प फेरसर्वेक्षण करून प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत ही सकारात्मक बाब असली तरी शेवगावकरांनी पाथर्डीच्या दुष्काळी पट्ट्यातील मागास असलेल्या भगवानगड परिसरातील गावांना ताजनापूर प्रकल्पाचे पाणी देण्यास विरोध करणे हा विरोधाभास नसून सोयीस्कर राजकीय चाल असल्याचे बोलले जात आहे सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे शेवगाव पाथर्डी मतदारसंघ पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागात पिढ्या न पिढ्या अतिशय मागास आणि विकासापासून वंचित राहिला आहे या भागात मिनी इंडस्ट्रियल शैक्षणिक हब तसेच पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची सुविधा आरोग्य सुविधा गेल्या पाच दशकापासून येथील ऊसतोड मजूर कामगार वाट पाहत आहे परंतु दुर्दैवाने कुठल्याही प्रकल्प प्रत्यक्षात अमलात आले नाही २०१९ यावर्षी महाविकास आघाडीचे सरकार असताना भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजनेला मंजुरी मिळाली जवळपास २०३ कोटी रुपये खर्च करून भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम प्रत्यक्षात सुरू झाले परंतु गेल्या सात वर्षांपासून योजना कागदोपत्री घोडे नाचून योजनेचा राजकीय वापर केल्याचा आरोप होत आहे भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजना दोन वर्षात पूर्ण करणे शासनाच्या अटी शर्तीस अधिन राहून पूर्ण करणे बंधनकारक होते परंतु संबंधित एजन्सी व अधिकाऱ्यांनी काही राजकीय समझोता एक्सप्रेस लोकांना हाताशी धरून योजना गिळंकृत करून टाकली यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी निलंबित करण्यात आले पुन्हा एकदा भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजनेची फेरसर्वेक्षण करून योजना गतिमान व कार्यान्वित करण्यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा व बैठक आयोजित करण्यात असल्याचे बोलले जात आहे येणाऱ्या काळात पाथर्डीच्या पूर्व भागातील २७ गावांना हक्काचे पिण्यासाठी व सिंचनासाठी पाणी ( २.५) टीएमसी पाणी मिळावे यासाठी ताजनापूर प्रकल्प टप्पा क्रमांक तीन साठी ५०० कोटी रुपये खर्च करून प्रकल्प पूर्ण करण्याच्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आश्वासनाला तडा जातो की प्रकल्प पूर्णत्वास येतो हे भटके मागास ऊसतोड मजूर गोरगरीब शेतकरी पाहणार आहेत सोबतच भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजनेचा बट्ट्याबोळ करणाऱ्या राजकीय एजंटा बरोबर एमजीपीच्या अधिकाऱ्यांनी भगवानगड परिसरातील ४६ गावातील भटके विमुक्त शेतकऱ्यांचा भावनांशी खेळ केला असल्याने त्यांना नियती धडा शिकवेल परंतु पाच दशकावून अधिक भटके विमुक्त गोरगरीब शेतकरी माता माउल्या आजही पिण्यासाठी पाणी व शेती सिंचनासाठी पाण्याची वाट पाहताना दिसत आहे राज्यकर्त्यांना व संत भगवानबाबांना मानणाऱ्या महायुती सरकारमधील मंत्र्यांनी किमान भटके विमुक्त गोरगरीब ऊसतोड मजुरांच्या भावनांशी खेळण बंद करून तातडीने नाथसागर पैठण जायकवाडी जलाशयातून हक्काचे ताजनापुर टप्पा क्रमांक तीन प्रकल्प व भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास व कार्यान्वित करून इथल्या भटक्या विमुक्त गोरगरीब शेतकरी कष्टकरी मजूर व मातामाऊल्यांना आधार द्यावा एवढीच अपेक्षा.

## मंडळनिहाय चारा छावण्या तात्काळ सुरू करा

### भाऊसाहेब घुगे यांची पालकमंत्री यांच्याकडे मागणी

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये मंडळनिहाय चारा छावण्या तात्काळ सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केली.याबाबत मुंबई येथील रामटेक बंगल्यावर जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई, चाऱ्याची कमतरता तसेच पशुपालकांसमोरील अडचणींबाबत पालकमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.



जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, अंबड, घनसावंगी, परतूर व मंठा या आठही तालुक्यांमध्ये यंदा अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने अनेक भागांत पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. नदी-नाले, तलाव व जलसाठे पुरेशा प्रमाणात भरलेले नसल्याने जनावरांसाठी पिण्याचे पाणी तसेच चारा उपलब्ध करून देण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.निवेदनातील प्रमुख मागण्या

आठही तालुक्यांमध्ये मंडळनिहाय किमान एक चारा छावणी तात्काळ सुरू करावी. चारा छावण्यांमध्ये जनावरांसाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करून द्यावा. जनावरांसाठी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. चारा छावण्यांमध्ये जनावरांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. पाणी व चाऱ्याची टंचाई अधिक असलेल्या भागात गरजेनुसार अतिरिक्त चारा छावण्या सुरू कराव्यात. जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन शेतकरी व पशुपालकांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी.दुष्काळग्रस्त शेतकरी व पशुपालकांच्या पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने चारा छावण्या सुरू करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाऊसाहेब घुगे यांनी केली.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके , मा. जि. प. सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाषराव बोडखे आणि प्रगतिशील शेतकरी रामेश्वर दराडे उपस्थित होते.

## भास्कर आबा दानवेंचा ई-बसने प्रवास; ड्रायव्हर आणि प्रवाशांशी साधला संवाद!

जालना। प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त वाहतुकीचा संदेश देण्यासाठी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून भाजप महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी आज जालना ते छत्रपती संभाजीनगर असा ई-बसने प्रवास केला.पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याच्या उद्देशाने त्यांनी 'दर महिन्याला एकदा सार्वजनिक वाहनातून प्रवास करण्याचा' संकल्प यावेळी जाहीर केला.

प्रवासादरम्यान भास्कर आबा दानवे यांनी ई-बसच्या ड्रायव्हरशी (चालक)



विशेष संवाद साधला. ई-बस चालवतानाचा अनुभव, बसचे तंत्रज्ञान, चार्जिंग व्यवस्था आणि प्रवाशांचा मिळणारा प्रतिसाद याविषयी त्यांनी ड्रायव्हरकडून माहिती जाणून घेतली. तसेच बसमधील सामान्य प्रवाशांशीही संवाद साधून त्यांच्या अडचणी व प्रवासाबाबतच्या प्रतिक्रिया त्यांनी ऐकून घेतल्या.याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, ई-बसचा वाढता वापर हे स्वच्छ आणि हरित भविष्याच्या दृष्टीने टाकलेले एक सकारात्मक पाऊल आहे. यामुळे इंधनाची बचत तर होतेच, शिवाय वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यास मोठी मदत होते.पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक जबाबदारी आहे, असे नमूद करत नागरिकांनीही दैनंदिन आयुष्यात पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## आरती केदारची निवड

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील हत्राळ गावची आरती शरद केदार हिची त्रिपुरा महिला सीनियर रणजी क्रिकेट संघात नुकतीच निवड झाली आहे त्रिपुरा लखनऊ येथे होणाऱ्या महिला सीनियर रणजी टी ट्वेंटी संघात आरती केदार त्रिपुरा महिला संघाकडून खेळणार आहे यापूर्वीही महिला आयपीएल टी ट्वेंटी संघ अंडर १९ महिला संघाकडून आरती खेळली आहे आरती पाथर्डी शहरातील एम.एम. निराळी विद्यालयाची विद्यार्थिनी असून पाथर्डीतील एस.व्ही.नेट येथे आरती केदार हिने प्रशिक्षक शशिकांत निराळी यांच्याकडून क्रिकेटचे प्रशिक्षण घेतले आहे आरती ही



उत्कृष्ट गोलंदाजी व फलंदाजी करणारी महिला खेळाडू असून तिचा अष्टपैलू खेळाडू म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे आरती केदार हिच्या निवडीबद्दल ज्येष्ठ नेते एड.प्रताप ढाकणे यांनी व सर्व पाथर्डीकरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## जिल्हाध्यक्षपदी राजेश भालेराव यांची फेरनिवड

जालना। प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या व्हॉइस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी दैनिक आनंदनगरीचे जिल्हा प्रतिनिधी राजेश भालेराव यांची फेरनिवड करण्यात आली आहे. तसेच सचिवपदी रविकांत दानम यांची निवड करण्यात आली असून कोषाध्यक्षपदी अशोक मिश्रा यांना कायम ठेवण्यात आले आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांच्या सूचनेनुसार जालना जिल्ह्याची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करणे, पत्रकारांचे हक्क आणि हितसंबंध जपणे तसेच संघटनेची जिल्ह्यातील व्याप्ती

वाढविण्याच्या उद्देशाने ही कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी अंकुशराव देशमुख, मकरंद जहागीरदार आणि भरत धपाटे यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी नूर अहमद, राजेश भिसे आणि अर्पण गोयल यांची निवड झाली आहे. कार्यवाहक म्हणून रविंद्र बांगड आणि गोविंदप्रसाद मुंदडा यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संघटक म्हणून विजय साळी, भरत सवणे, लियाकत अलीखान, भगवान साबळे आणि विष्णू कदम यांची निवड करण्यात आली आहे. मार्गदर्शक मंडळात लक्ष्मण राऊत, बद्रीनाथ टेकाळे, शिवरतन मुंदडा आणि संजय भरतीया यांचा समावेश करण्यात आला आहे. शहराध्यक्षपदी सदानंद



देशमुख, साप्ताहिक जिल्हाध्यक्षपदी बंडू सुरडकर, युट्यूब चॅनल जिल्हाध्यक्षपदी दर्पण जैन, तर प्रसिद्धी प्रमुखपदी सुहास वैद्य यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय सदस्य म्हणून अंकुश गायकवाड, गजानन देशमुख, इम्रान सिद्दीकी, भरत मानकर, घनश्याम देवकाते, राम भालेराव, हुसेन कादरी, कैलास फलारी, रविंद्र मुंडे, लहू गाढे आणि दीपक ढोले यांची निवड करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीच्या निवडीनंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला असून जिल्ह्यात व्हॉइस ऑफ मीडियाचे कार्य अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले.

## धीर सोडू नका, खचून जाऊ नका-बोराडे

### शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन साधला संवाद

मंठा। प्रतिनिधी

यावर्षी पावसाअभावी खरीप पिकांची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए. जे. बोराडे यांनी जयपूर, शिवनगिरी, बेलोरा यासह परिसरातील विविध गावांमध्ये प्रत्यक्ष शेतांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी संकटग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत धीर सोडू नका, खचून जाऊ नका; या संकटाच्या काळात आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत, असा दिलासा दिला.मंठा तालुक्यासह जालना जिल्ह्यात पावसातील मोठ्या खंडामुळे खरीप पिकांना फटका बसला आहे. शेतकऱ्यांनी शेतीसाठी केलेला मोठा खर्च आता वाया गेल्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. कापूस, सोयाबीनसह विविध पिके नष्ट झाल्याने शेतकरी हताश झाला आहे. परिस्थिती



अत्यंत गंभीर असून शासनाकडून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शेतकऱ्यांची परिस्थिती आणि झालेल्या नुकसानीची माहिती मांडून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करू, अशी ग्वाही ए. जे. बोराडे यांनी शेतकऱ्यांना दिली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत पोहोचवण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. असे श्री बोराडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले.अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटलेली, पाने कोमेजलेली आणि उत्पादनावर मोठा परिणाम झाल्याचे शेतकऱ्यांनी बोराडे यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी शेतकऱ्यांनी पीक नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणी याबाबत आपल्या व्यथा मांडल्या. शेतकऱ्यांनी संकटाच्या काळात खचून जाऊ नये. शासनस्तरावर मदतीसाठी पाठपुरावा करण्याबरोबरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे बोराडे यांनी सांगितले.यावेळी माजी सभापती संतोष वरकड, श्रीरंगराव खरात, पप्पू दायमा यांच्यासह जयपूर सर्कलमधील शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त भव्य रॅली

मंठा। प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त मंठा शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विवेक घारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी ही रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये माजी आमदार राजेश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.देशभक्ती गीतांसोबत आणि देशभक्तीच्या घोषणांनी मंठा शहर दुमदुमून गेले. देशप्रेम, राष्ट्रसेवा, सत्य आणि अहिंसेचा संदेश देत शहरातील प्रमुख मार्गांवरून ही भव्य रॅली काढण्यात आली. मंठा शहरात प्रथमच अशा स्वरूपाच्या रॅलीचे आयोजन झाल्याने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

या रॅलीमध्ये निळकंठ वायाळ, सुरेश वाव्हळे, डॉ. शिवाजी गणगे, डॉ. शरद शेळके, शरद बोराडे, राजेश खंदारे, प्रकाश घुले, गणेश घारे, बंडू घारे, विलास वाव्हळे, कय्युम कुरेशी तसेच देशभक्त नागरिक, काँग्रेसचे कार्यकर्ते



व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि शांततेच्या विचारांचे तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, राष्ट्रसेवा आणि 'जय जवान, जय किसान' या संदेशाचे स्मरण करण्यात आले. देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करण्यात आली. रॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांनी महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प घेतला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.०५ ऑक्टोबर २०२६ | ६

# जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी

## शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध –ना. पंकजा मुंडे

बीड । प्रतिनिधी

यावर्षी पावसाने ओढ दिल्यामुळे बीड जिल्ह्यातील अकराही तालुक्यांवर दुष्काळाचे संकट ओढवले आहे. पावसाच्या अभावामुळे शेतकऱ्यांची उभी पिके करपली असून हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या पार्श्वभूमीवर,पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील विविध दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांनी बीड तालुक्यातील वंजारवाडी, काकडहिरा, मुर्शदपूर, लिबांदेवी तसेच पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी नायगाव, रोहतवाडी, तांबा राजुरी, तळे पिंपळगाव, करंजवण आदी गावांमधील शेतशिवारात प्रत्यक्ष जात पिकांच्या नुकसानीचा आढावा घेतला.



या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या व्यथा व अडचणी जाणून घेतल्या. या कठीण काळात शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. इतिहासात पहिल्यांदाच केंद्र आणि राज्याचे पारंपरिक निकष बाजूला सारून शासनाने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे. प्रशासकीय यंत्रणेला पिकांच्या नुकसानीचे व पंचनाम्याचे काम अचूक आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तोंडावर आलेला सण पाहता, शासनाकडून शेतकऱ्यांच्या संकटांची तीव्रता कमी करण्यासाठी आणि त्यांची दिवाळी गोड करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. तसेच ३२ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी असो वा इतर मदत, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाच्या या संवेदनशील भूमिकेमुळे शेतकरी वर्गाला मोठा आधार मिळाला असून, प्रशासनाकडून मदतीची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू असल्याचेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

## पाच टर्म आमदार असलेल्या सुरेश धस यांच्यावर टीका म्हणजे सूर्यावर फुंकर मारण्यासारखे!

### भाजपा उपाध्यक्ष विष्णू खाडे यांचा विरोधकांवर घणाघात; बिनबुडाचे आरोप खपवून घेणार नाही

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस सातत्याने पाठपुरावा करत आहेत. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरून शासनदरबारी आवाज उठविणाऱ्या पाच टर्मच्या आमदारावर केवळ राजकीय हेतूने टीका करणे म्हणजे 'सूर्यावर फुंकर मारण्यासारखे' असल्याची जोरदार टीका भाजपा उपाध्यक्ष तथा माजी सरपंच विष्णू खाडे यांनी विरोधकांवर केली आहे.



प्रसिद्धीपत्रकाद्वारे आपली भूमिका मांडताना विष्णू खाडे म्हणाले की, आमदार सुरेश धस यांचा राजकीय प्रवास हा संघर्ष, जनसंपर्क आणि विकासकामांच्या पाठपुराव्याचा आहे. मतदारसंघातील शेतकरी, कष्टकरी, पशुपालक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी शासनाच्या पातळीवर मांडून त्यावर तोडगा काढण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीतही शेतकऱ्यांना मदत मिळावी, पशुधनासाठी आवश्यक उपाययोजना व्हाव्यात आणि नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे.

'जनतेच्या प्रश्नांवर राजकारण नको'

जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर असताना विकासकामे आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी काही विरोधकांकडून व्यक्तिगत टीका व बिनबुडाचे आरोप केले जात असल्याचा आरोप खाडे यांनी केला. राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र जनतेच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या लोकप्रतिनिधीवर तथ्यहीन आरोप करणे योग्य नाही. आरोप करण्यापूर्वी संबंधितांनी वस्तुस्थिती तपासावी आणि धस यांनी मतदारसंघासाठी केलेल्या कामांचा आढावा घ्यावा, असेही त्यांनी सुनावले.

'बिनबुडाचे आरोप खपवून घेणार नाही'

आमदार सुरेश धस यांच्या कार्यपद्धतीवर टीका करण्यापूर्वी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीचा आणि जनतेशी असलेल्या नात्याचा विचार करावा. पाच वेळा जनतेने त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे, ◀◀ पान ३ वर



बीड : बीडच्या रेल्वे मार्गाच्या शिल्पकार, माजी खासदार स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी समाधीस्थळी अभिवादन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह समर्थकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## स्व. केशरकाकू क्षीरसागर यांचा मरणोत्तर सन्मान

### स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समिती व स्वातंत्र्यसैनिकांच्या वतीने सन्मानपत्र; जयदत्त क्षीरसागर यांनी स्वीकारले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या माजी खासदार तथा अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या २० व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांना मरणोत्तर सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समिती व स्वातंत्र्यसैनिकांच्या वतीने हा सन्मान करण्यात आला. स्व. काकूंच्या वतीने त्यांचे पुत्र तथा अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सन्मानपत्र स्वीकारले.



'काकू नाना प्रतिष्ठान, बीड' यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास केंद्र सरकारचे आवास व शहरी विकास राज्यमंत्री टोकन साहू, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार बसवराज पाटील, आमदार विक्रम काळे, माजी आमदार भीमराव धोंडे, छत्तीसगड महिला आयोगाच्या अध्यक्षा ममता साहू, अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे राष्ट्रीय महासचिव रामलाल गुप्ता, दयाभाई मोदी यांच्यासह साधू-संत, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्व. केशरकाकूंनी बीडला रेल्वे मिळावी तसेच जिल्ह्याचा विकास व्हावा यासाठी सुमारे २५ वर्षे सातत्याने संघर्ष केला. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे यावेळी स्मरण करण्यात आले. त्यांच्या रेल्वे आंदोलनातील योगदानाबद्दल ◀◀ पान ३ वर

## दुष्काळाच्या प्रश्नांवर शेतकऱ्यांची दिंद्रुड येथे दुष्काळ परिषद; पाच ठराव सर्वानुमते मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यानंतर यावर्षी महागडी खते-बियाणे खरेदी करून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना पावसाअभावी मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे.या पार्श्वभूमीवर दि ०४ ऑक्टोबर रविवार रोजी दिंद्रुड येथे शेतकरी दुष्काळ परिषदेचे आयोजन करण्यात आले.

या दुष्काळ परिषदेचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शेतकरी चव्हाण मामा यांनी भूषविले. परिषदेत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी दुष्काळाच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी पाच ठराव मांडण्यात आले आणि ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले. तसेच आगामी काळात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.




या दुष्काळी परिषदेत पाच प्रमुख मागण्या

दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी.

सन २०२५-२६ खरीप हंगामाचा पीकविमा हेक्टरी १७,५०० रुपये तातडीने खात्यावर जमा करावा. गेल्या वर्षीची २२५ रुपयांची फरकाची

◀◀ पान ३ वर

## सविताताई जाधव यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पवारवाडी येथील सविताताई बाबुराव जाधव यांचे दि.०४ आक्टोंबर रविवार रोजी पहाटे १:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय ४८ वर्षे होते, त्यांच्या पार्थिवावर रविवार रोजी दुपारी १२:०० वाजता त्यांच्या गावा शेजारील शेतमळयात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती,तीन मुली,एक मुलगा असा परिवार आहे.पवारवाडी येथील प्रगतिशील शेतकरी बाबुराव जाधव यांच्या त्या पत्नी व डॉ.गणेश जाधव यांच्या आई होत.



## आधार वृद्धाश्रमाला आ.धस यांची सदिच्छा भेट; ज्येष्ठ नागरिकांशी साधला मनमोकळा संवाद!

### १५ वर्षांपासून लोकसहभागातून वृद्धाश्रमाचा कारभार; सर्जेराव देशमुख यांच्या सेवाभावी कार्याचे केले कौतुक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टा, ता.वाळवा,जि. सांगली येथील आधार वृद्धाश्रमाला आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी सदिच्छा भेट देत तेथील ज्येष्ठ नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी त्यांनी वृद्धाश्रमातील निराधार ज्येष्ठ नागरिकांची आस्थेने विचारपूस केली, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच जेवणाच्या व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. आयुष्याच्या उत्तरार्धात आधाराची गरज असलेल्या ज्येष्ठांची सेवा करण्याचे कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.



आधार वृद्धाश्रमात निराधार, अनाथ आणि कुटुंबाचा आधार न मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांना मायेची ऊब, प्रेम आणि सन्मानाने जगण्याचा आधार दिला जातो. विशेष म्हणजे, गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ कोणतेही शासकीय अनुदान न घेता केवळ लोकसहभागातून आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीवर या वृद्धाश्रमाचा कारभार सुरू आहे.सर्जेराव देशमुख यांच्याकडून ३० ते ३५ निराधार ज्येष्ठांची सेवा

वृद्धाश्रमाचे संचालक सर्जेराव देशमुख हे पोटच्या मुलांकडून सांभाळ केला जात नसलेल्या तसेच निराधार झालेल्या ३० ते ३५ ज्येष्ठ नागरिकांची मायेने काळजी घेत आहेत. त्यांच्या जेवणाची, राहण्याची आणि औषधोपचारांची व्यवस्था करून ते ज्येष्ठांना आधार देत आहेत. कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय लोकसहभाग आणि ◀◀ पान ३ वर

## ना.पंकजा मुंडे माजलगाव तालुक्यात आज करणार दुष्काळ पाहणी दौरा

माजलगाव । प्रतिनिधी



राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे या आज दि ०५ ऑक्टोबर सोमवार रोजी माजलगाव तालुक्यातील दुष्काळाची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा देणार आहेत.

राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरी दुष्काळाची भयानकता लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार व दिलासा देणे आवश्यक आहे.ना. पंकजाताई मुंडे यासाठी जिल्ह्यात येत असून आज दि ०५ ऑक्टोबर सोमवार रोजी माजलगाव येथे दुपारी दुष्काळ व पीक परिस्थितीची पाहणी करणार आहेत.तरी भारतीय जनता पार्टीचे नेते गण पदाधिकारी शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते यांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## बीडचे जनसंपर्क कार्यालय प्रत्यक्ष जनसेवेत रूजू
## ना.पंकजा मुंडेंचा पहिलाच 'जनता दरबार' हाऊसफुल्ल

### नागरिकांशी 'फेस टू फेस' संवाद ; लोकांच्या समस्यांचा जागेवर निपटारा; बीड, गेवराई, आष्टी,पाटोदा, शिरूर कासार तालुक्यातील जनतेची गर्दी

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी शहरात नव्यानेच सुरू केलेले जनसंपर्क कार्यालय आज प्रत्यक्ष जनसेवेत रूजू झाले आहे. ना. पंकजाताईंनी घेतलेला पहिलाच 'जनता दरबार' हाऊसफुल्ल झाला. प्रत्येकांची समोरासमोर भेट आणि समस्यांचा जागेवरच निपटारा झाल्याने नागरिकांच्या चेहर्‍यावर समाधान दिसून आले. बीडसह गेवराई, आष्टी,पाटोदा, शिरूर कासार, वडवणी आदी तालुक्यातील जनतेची गर्दी यावेळी पहायला मिळाली.



शहरातील तहसील कार्यालयासमोरील साधना अव्हेन्यू व्यापारी संकुलात हे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले असून मागील आठवड्यात याचे लोकार्पण झाले होते. ना. पंकजाताई मुंडे आज दुष्काळाची पाहणी करण्यासाठी आल्या होत्या, तत्पूर्वी त्यांनी दुपारी जनसंपर्क कार्यालयात येऊन सुमारे चार तास जनता दरबार घेऊन जनतेच्या समस्या, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेतली आणि समस्यांचे जागेवरच निराकरण केले. सर्व सामान्य माणसापासून ते राजकीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यां पर्यंत ◀◀ पान ३ वर

## शशिकिरण गडम यांची महाराष्ट्र चेंबरच्या गव्हर्निंग कौन्सिलवर स्वीकृत सदस्य म्हणून निवड

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रिकल्चर (M-CCI-)च्या संचालक मंडळावर माजलगाव येथील उद्योजक व व्यापारी श्री. शशिकिरण गडम यांची गव्हर्निंग कौन्सिलवर स्वीकृत सदस्य म्हणून निवड झाली आहे.

व्यापार, उद्योग व व्यावसायिक क्षेत्रात सक्रिय सहभाग तसेच व्यापारी व उद्योजकांच्या विविध प्रश्नांसाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची ही निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर चेंबरच्या माध्यमातून काम करण्याची संधी त्यांना मिळणार आहे.

शशिकिरण गडम यांच्या निवडीबद्दल माजलगावसह बीड जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, विविध सामाजिक संस्था व मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26